आम्ही शोधतोय
ऑनलाईन जगातला
महाराष्ट्राचा महाकवी

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, १ फेब्रुवारी २०२४


महाराष्ट्राचा महाकवी २०२४

# प्रथम फेरी विजेते

- विष्णू जाधव — नाशिक
- नामदेव चोथे — पालघर
- विजय पोहनेरकर — छत्रपती संभाजीनगर
- महेश कालिंगे — कोल्हापूर
- संजय कुलकर्णी — उदगीर
- हनुमंत माने — धाराशिव
- संजय सूर्यवंशी — धुळे
- संदीप गव्हाणे — छत्रपती संभाजीनगर
- दीपक वारांगणे — जळगाव
- हेमंत देशमुख — यवतमाळ
- वृषाली वाघ — छत्रपती संभाजीनगर
- ज्योती आळंदकर — लातूर
- गंगाधर पवार — पालघर
- विजया बाबर — सातारा
- नीता लांडे — वाशिम
- मनीष अहिरे — नाशिक
- मनीषा ठोंबरे — सांगोला
- वाल्मीक निकम — छत्रपती संभाजीनगर

विजयी झालेल्या सर्व स्पर्धकांनी दुसऱ्या फेरीसाठी आपल्या कवितेचा व्हिडीओ 5 फेब्रुवारीपर्यंत 7620838883 या नंबरवर पाठवायचा आहे.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# निसर्गरम्य श्रीक्षेत्र बदामी



आधुनिक केसरी

त्याचप्रमाणे ऐहोळे, पट्टदकल येथील पुरातन मंदिरे प्रेक्षणीय आहेत. ही लेणी आणि मंदिरे पाहताना आपल्यासोबत जर गाईड असेल तर त्या लेण्यांचा इतिहास अतिशय सुंदर पद्धतीने आपल्यासमोर उलगडला जातो आणि आपण त्यांचा अधिक आंनद घेऊ शकतो. आपल्याकडे अधिक वेळ असेल तर आपण हम्पी, तुंगभद्रा डॅम आधी ठिकाणी पण पाहू शकतो.

शाकंभरी मातेच्या अवताराची कथा अतिशय रम्य आहे. दुर्गम नावाच्या असुराने तपसामर्थ्याच्या बळावर ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले. ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या वराने तो अजिंक्य आणि उन्मत्त झाला. इंद्रादी देवांना त्याने पराभूत करून बंदी बनवले. इंद्रादी देव बंदिवासात असल्याने पाऊस पडेनासा झाला. पृथ्वीवर भयंकर दुष्काळ पडला. नद्या, सरोवर, तलाव आटले. विहिरी कोरड्या पडल्या. वनस्पती, मानव आणि पृथ्वीवरील यच्चयावत प्राणी अन्नपाण्याविना तडफडू लागले. देवांना हे पाहवेना म्हणून त्यांनी देवी भगवतीची प्रार्थना केली. या संकटातून आम्हाला सोडावं म्हणून साकडे घातले. अन्नपाण्याविना तडफडत असलेली प्रजा पाहून देवीच्या नेत्रात करुणा दाटून आली. तिने शंभर नेत्र असलेले रूप धारण केले. त्या नेत्रातून कृपारूपी जलधाराची वृष्टी झाली. तहानलेल्या धरतीला त्या जलधारांनी शांत केले. नद्या, सरोवरे,तलाव, विहिरी भरल्या. धरित्रीने हिरवा शालू परिधान केला. अन्नधान्याचा सुकाळ झाला.  अनेकविध भाज्यांची निर्मिती झाली. देवीने प्रजेचे दुःख हरण केले. विविध भाज्या म्हणजे शाक निर्मिती तिच्या कृपेने झाली म्हणून ती शाकंभरी झाली. शंभर नेत्र असलेले रूप तिने धारण केले म्हणून तिला शताक्षी म्हणू लागले. त्यानंतर देवीने ब्रह्मदेवाच्या वराने उन्मत्त झालेल्या दुर्गम राक्षसाचा त्याच्याशी भयंकर युद्ध करून संहार केला. त्यामुळे शाकंभरी दुर्गा या नावाने प्रसिद्ध झाली.

## आनंदी पहाट



# आपले सामाजिक स्थान महत्त्वाचे

आधुनिक केसरी

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, सामाजिक कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपल्या सामाजि बांधिलकीचे नाते असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपले सामाजिक स्थान. ह्या सामाजिक स्थानाचा संबंध थेट आपल्या सामाजिक बांधिलकीशी असतो. एक प्रकारे आपल्या बांधिलकीमुळे सामाजिक कुटुंबाचीच, नवीन नात्यांचीच निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकीचे महत्व सामाजिक कुटुंबासाठी समजून घेणे जरुरीचे असते. आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपण उगाचच असे करत राहतो. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय देखील मिळत असतो. आपल्या भागाचे, वाट्याचे, नावचे, कर्तव्याचे भान ठेवून सहजीवनात सहभागी होणे महत्वाचे असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक वातारणाची निर्मिती करत राहणे गरजेचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## अद्वैती ईश्वर | भेटे जीवा ||

आकळेना काही | तळ सागराचा ||
तैसा संसाराचा | अंत नाही ||१||
आकाश पृथ्वी | वाऱ्याचे अंगण ||
दिशांचे आंदन | तैसे मना ||२||
सात्विक बुद्धीचे | घालता कुंपण ||
मनाची कंपणे | शांत होती ||३||
ध्यान मग्न मौनी | श्वासाशी संवाद ||
परावाणी नाद | अंतरात ||४||
आत्मानुभूतीचा | होता साक्षात्कार ||
अद्वैती ईश्वर | भेटे जीवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

जन्मवरी स्वार्थ केला । तितुकाहि वेर्थ गेला ।
कैसा विषम काळ आला । अंतकाळीं ॥५०॥
सुखाकारणें झुरला । सेखीं दुःखें कष्टी जाला ।
पुढें मागुता धोका आला । येमयातनेचा ॥५१॥
जन्म अवघा दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ ।
म्हणोनियां तत्काळ । स्वहित करावें ॥५२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

काष्ठ अगिन विद्यमान है,
अगिन योग परकाश ।
नीर पाय अन्दर गई, तिमि गुण कर्म विकाश ।।१८।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय) ०४/०४/१८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : लाकडात अग्नी लपलेला असतो, घर्षणाने तो प्रगट होतो आणि त्यावर पाणी पडल्यास तो आत गुप्त होतो, तद्वतच योगाद्वारे आत्म्याची शक्ती पूर्णपणे प्रगट होते आणि प्रकृतीशी संबंध आल्यावर शक्ती आत लपली जाते. योग-संघर्षाने आत्म्याचे सर्व चेतन गुण प्रगट होतात आणि प्रकृती संबंधीत गुण दूर होतात. जिथे आत्म्याचा प्रकृतीशी नितांत संबंध विच्छेद होतो, यालाच शुद्ध आत्मप्रकाश म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ६३वे


इंदूरच्या लोकांना नामाची गोडी लावली । शास्त्रीबुवांना नाम प्रचिती दिली। चित्त शुद्धी त्यांची केली । श्रीमहाराजांनी ।।१।।
दुष्काळी परिस्थिती बिकट झाली । पाण्याची टंचाई इंदुरात झाली । अन्नदानाची सोय केली । श्रीमहाराजांनी ।। ३ ।रामनाम प्रेमी एक माळी । नामात दंग तिन्ही-त्रिकाळी । बाग फुललेली त्याची सर्वकाळी । आहे रामराया बागेत तुझ्या- म्हणे श्रीमहाराज ।। ४ ।। इंदुराचा मुक्काम हलवला। सारे आले नाशिकला । रामाच्या दर्शनाला । जाती महाराज नित्यदिनी ।। ५ ।।
महाराजांना बोले एक संन्यासी । साधू कैसा म्हणू यासी । त्याची जिरवली खासी । सांगून त्याचीच कथा त्याला, केले पार खजील ।। ६ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# प्रपंचाच्या अपूर्ण गोष्टींत केव्हाही समाधान मिळणार नाही

आधुनिक केसरी



सर्व अनुभवांत आत्मप्रचीती ही खरी. दुसऱ्याने पुष्कळ अनुभव सांगितले, परंतु स्वतःला येईल तो अनुभव हाच खरा महत्त्वाचा. आत्मप्रचीतीने जागरूकता येईल, भाव वाढेल, साधनाला जोर येईल आणि भगवत्प्राप्ती लवकर होईल. संतांनी पुष्कळ गोष्टी आजवर आपल्याला सांगितल्या परंतु त्यांना देव जसा हवासा वाटला तसा आपल्याला वाटतो का ? प्रपंच करीत असताना भगवंताची आपल्याला आवश्यकता वाटते का ? आपण असा विचार करावा की, आपण लहानाचे मोठे झालो, विद्या संपादन केली, नोकरी मिळाली, लग्न झाले, मुलेबाळे झाली, घरदार केले परंतु आपल्याला अजून काहीतरी हवेसे वाटतेच आहे ! हे आपले ‘हवेपण’ केव्हा संपणार ? पण नोकरी करतो, कोणी वकिली, डॉक्टरकी; नोकरी करणारा, मालकाला आपल्याशिवाय दुसरा कोणी नोकर मिळणार नाही म्हणून काही नोकरी करीत नाही किंवा अशीलाला कोणी दुसरा वकील मिळणार नाही म्हणून वकील वकिली करीत नाही. म्हणजेच नोकरीवाला काय, डॉक्टर काय, वकील काय कोणीही आपापले कर्म केवळ त्या कर्मासाठीच करीत नाही, तर त्यातून आपल्याला सुख मिळेल ह्या ईर्ष्येने तो ते करीत असतो. परंतु आपण पाहतोच की सर्व काही केले, आयुष्यही संपले, तरी काहीतरी करण्याचे राहूनच जाते; त्याला पूर्णता येत नाही. एखादी गोष्ट आपल्याला मिळाली की, आता ह्यापुढे काही करायचे उरले नाही असे काही वाटत नाही. आता काहीएक नको आहे, जेवढे आहे त्यात समाधान आहे असे कधी वाटते का ? पुढे कसे होईल, हे सर्व टिकेल का, ह्यात आणखी भर कशी पडेल याची विवंचना कायमच ! एखाद्याचे लग्न ठरले ते झाले की आता प्रपंचाची काळजी मिटली असे वाटते का ? लग्न झाल्यावर, समजा पाच वर्षे मूल झाले नाही, तरी हा काळजी करतोच; आणि समजा, मुलेच मुले झाली तरीही याची काळजी आहेच ! तेव्हा या प्रपंचाच्या गोष्टी अपूर्ण आहेत. त्यांतून समाधान लाभेल हे कसे शक्य आहे ? ह्या गोष्टी एकांतून एक निर्माण होणाऱ्या आहेत. ज्या ज्या म्हणून सुखाच्या गोष्टी मानल्या त्या सर्व जरी एकत्र केल्या तरी त्यांतून समाधान निर्माण होणार नाही. ज्या गोष्टी अपूर्णच आहेत त्यांतून पूर्णस्वरूप असलेले समाधान कसे लाभेल ? समजा, एका वेड्याच्या इस्पितळात दोनशे वेडे आहेत; जर कुणी म्हणाले की, आता आणखी शंभर वेडे आले की एक शहाणा त्यांतून निर्माण होईल, तर हे कधी शक्य आहे का ?

६८. मनुष्याला किती असले म्हणजे पुरे होईल हे ठरलेले नाही. आहे त्या परिस्थितीमध्ये आपण समाधान मानले की जे आहे ते पुरेल.

## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

पहाटे आणि रात्री ती देवासमोर नृत्य आणि भजन करी. लोकांना वाटे ती देवाचं वेड घेतलेली, गरीब शेतकऱ्याची पोर आहे. कान्होपात्रा दिवसेंदिवस विठ्ठलभक्तीत खोल बुडत गेली. लोक तिचा आदर करू लागले. भोगविलासाची इच्छा तिला नव्हतीच. मुळचा ओढाच परमार्थाकडे असल्याने तिच्या ध्यानी मनी विठ्ठल राहू लागला. मन त्याच्या चरणी एकाग्र होऊ लागले. त्याची भेट व्हावी म्हणून तळमळ होऊ लागली. जिवाचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई सावळे डोळसे करूणा येथु देई काही अशी आर्त विनवणी उमटू लागली.

गुरूवार, १ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १६५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 1 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-165 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात हिंदूंना पूजेचा अधिकार

## सात दिवसांत पूजाअर्चा करण्याची व्यवस्था करून देण्याचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**वाराणसी : न्यायालयाने बुधवारी हिंदू भाविकांना ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात प्रार्थना – पूजा करण्याचा अधिकार बहाल केला आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार हिंदू भाविक 'व्यासाचे तळघर' (व्यास का तेखाना) मध्ये पूजा करू शकतात. सध्या मशिदीतील हा भाग बंद ठेवला गेलेला आहे. जिल्हा प्रशासनाने पुढील सात दिवसांत हिंदूंना त्याठिकाणी पूजाअर्चा करण्याची व्यवस्था करून द्यावी, असेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत.**

या निकालानंतर हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, व्यासाचे तळघर येथे हिंदूंना पूजाअर्चा करण्यासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे. आता जिल्हा प्रशासनाने सात दिवसांच्या आत तिथे व्यवस्था करून द्यावी, जेणेकरून तिथे प्रत्येकाला पूजा करण्याची संधी मिळेल. यानिर्णयानंतर हिंदू पक्षकारांनी न्यायालयाबाहेर आनंद व्यक्त केला.

वाराणसी जिल्हा प्रशासनाने २४ जानेवारी रोजी ज्ञानवापी मशिदीच्या आवारातील दक्षिणेकडे असलेल्या तळघराचा ताबा घेतला होता. आचार्य वेद व्यास पीठ मंदिराचे मुख्य पुजारी शैलेंद्र कुमार पाठक यांनी यासंबंधी खटला दाखल केला होता. त्यानंतर वाराणसी जिल्हा न्यायालयाने मशिदीच्या दक्षिणेकडील तळघराचा ताबा वाराणसी जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे दिला होता. हिंदूंचे स्वप्न पूर्ण झाले आहे. जिल्हा प्रशासन सात दिवसांत तिथे व्यवस्था उभी करणार आहे. त्यानंतर हिंदू तिथे पूजाअर्चा सुरू करतील. काशी विश्वनाथ ट्रस्टकडून पूजापाठ केली जाईल. आमचे कायदेशीर लढाई होती, ती पूर्ण झाली आहे. यापुढे आता काशी विश्वनाथ पीठ ट्रस्ट निर्णय घेईल. न्यायाधीश के. एम. पांडे यांनी १ फेब्रुवारी १९८६ रोजी राम मंदिराचे टाळे उघडण्याचा निर्णय दिला होता. आजच्या निर्णयाची तुलना आम्ही न्यायाधीश पांडे यांच्या निर्णयाशी करत आहोत.




वाराणसी जिल्हा न्यायालयाचा निर्णय ऐतिहासिक असा आहे. याआधी सरकारांनी सत्तेचा दुरूपयोग करून हिंदू समाजाची पूजापाठ रोखले होते, त्याला आज न्यायलयाने खोडून काढले आहे. यापुढे आता वजूखान्याचा सर्व्हे करणे, हे आमच्या लक्ष्य असेल, अशी प्रतिक्रिया हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी दिली. जुलै २०२३ मध्ये वाराणसी जिल्हा न्यायालयाने भारतीय पुरातत्व विभागाला मशिदीमध्ये वैज्ञानिक सर्व्हे करण्याचे निर्देश दिले होते. मशिदीच्या आवारात यापूर्वी हिंदू मंदिर अस्तित्वात होते का? याचे पुरावे शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्याची परवानगी देण्यात आली होती. वाराणसीमध्ये असलेल्या काशी विश्वनाथ मंदिराच्या बाजूला ज्ञानवापी मशीद आहे. याच ज्ञानवापी मशीद परिसरात अगोदर मंदिर होते, असा दावा केला जातो; तर मुस्लीम पक्षकारांकडून हा दावा फेटाळण्यात येतो. हा वाद सध्या न्यायालयात पोहोचलेला आहे. २०२२ मध्ये पाच हिंदू महिलांनी ज्ञानवापी मशीद परिसराच्या बाहेरच्या भिंतीला लागून असलेल्या माँ श्रीनगर गौरीची पूजा करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. त्यासाठी या महिलांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर हे प्रकरण चांगलेच चर्चेत आले.

# लोकसभेसाठी संभाव्य उमेदवार म्हणून माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या नावाची चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** आगामी होऊ घातलेल्या २०२४ च्या नांदेड लोकसभा मतदारसंघाची विविध पक्षांकडून चाचपणी सुरू असून शिवसेना (उबाठा) जेष्ठ नेते माजी आ. रोहिदास चव्हाण यांचे नाव चर्चेत असून त्यांच्या नावाला सर्वाधिक पसंती असून नांदेड लोकसभेसाठी त्यांची उमेदवारी पक्की असल्याचे बोलले जात आहे. हिंदू हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत घडलेलं व्यक्तीमत्व म्हणून नोंद असलेले जेष्ठ शिवसैनिक असलेले व ज्यांनी शिवसेनेच्या प्रारंभीच्या काळात जिल्हाभरात सेनेची पाळेमुळे घट्ट रोवून तत्कालीन विरोधी पक्षांची दमछाक केली असल्यामुळे अजूनही तोच दबदबा तीच वचक तीच भीती सर्व विरोधी पक्षाना आहे. म्हणुन नांदेड जिल्ह्यातून भाजपाचे नामोहरम करण्यासाठी नांदेडचे पहिले शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवसेनेचे जेष्ठ नेते माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या नावाची चर्चा जोरदारपणे होत आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघातील कानाकोपऱ्यातील संपूर्ण खडानखडा माहिती असलेला एक जुना जाणता नेता म्हणून त्यांची नोंद वरिष्ठांकडे आहे. पुर्वीपासून वारकरी संप्रदायाची ध्वजा खांद्यावर घेऊन संस्कृती टिकून ठेवण्यासाठी धार्मिक, सांस्कृतिक कार्यात नेहमीच असलेला सहभाग महत्त्वाचा मानला जात आहे. माजी आ चव्हाणांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अनेकदा सर्व स्तरातील जातीधर्माच्या लोकांना अनेकदा संधी दिली. कधी सुडाचे राजकारण केले नाही. सद्य स्थितीतील राजकारण्यांसारखे कधी बेगडी रुप धारण केले नाही. सामाजिक दृष्टीकोन समोर ठेवून ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करत वंचित घटकांना न्याय दिला. ही त्यांची जमेची बाजू म्हणून त्यांना जुने निष्ठावंत शिवसैनिक नांदेड लोकसभेसाठी गळ घालत आहेत. सद्याचे सुडाचे राजकारण पाहून जनतेला निष्कलंक, चारित्र्य संपन्न, वारकरी संप्रदायाची आयुष्य भर ध्वजा खांद्यावर घेणारा सकल मराठा समाजाच्या मनातीला, अठरा पगड जातींना सोबत घेऊन चालणारा सर्व राजकीय पक्षातील भल्या भल्यांना घाम फोडणारा नेत्यांमधील कार्यकर्ता आज नांदेड लोकसभेसाठी हवा असल्याची जोरदार चर्चा नांदेड लोकसभा मतदार संघातील मतदरांतून होत आहे.



नांदेड लोकसभा मतदारसंघातील नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ, नांदेड उत्तर, भोकर, नायगाव, देगलूर, मुखेड हे विधानसभा मतदारसंघ कार्यक्षेत्र असले तरी संपूर्ण नांदेड जिल्हा भरातून माजी आ . रोहिदास चव्हाण यांच्या नावाला जास्तीची पसंती दिली जात आहे . तब्बल चार दशकांहून अधिकचा काळ जिल्हाभरात अजूनही शिवसैनिक, कार्यकर्ते टिकवून ठेवणं त्यांना जमलं . शहरासह खेड्यापाड्यातील माणसं सांभाळली शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते, शिवसैनिकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि अजूनही करत आहेत . माणसं जपली म्हणून निष्ठेने काम करणारा विरोधकांना तोडीस तोड असलेला एकमेव आगामी लोकसभेचा चेहरा म्हणून शिवसेनेचे १५ वर्ष पाहिले सेनेचे जिल्हा प्रमुख, माजी आ . चव्हाण यांच्या नावाची जोरदार चर्चा होत आहे . कित्येक आले आणि कित्येक गेले परी संकट काळात ही ना डगमगता निधड्या छातीचा हा वाघ, बाळासाहेबांच्या विचाराला व मातोश्रीला नेहमीच जपत, इमान राखणारा खंबीरपणे उभा हा वाघ . . म्हणुनच जिल्ह्यासह मराठवाड्यातील विरोधक आजही चव्हाण यांची धास्ती घेतात .

# मनोज जरांगेंनी दिला छगन भुजबळांना इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा आंदोलकांच्या झुंडशाहीसमोर नमते घेऊन सरकारने त्यांना मागच्या दाराने कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू केले आहे. सगेसोयरे वैगरे मागण्यांमुळे भटके-विमुक्त, वंचित, ओबीसींच्या आरक्षणावर घाला घातला जात आहे, अशा शब्दांत छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक आणि राज्य सरकारवर टीका केली आहे. मंत्री छगन भुजबळ म्हणाले, आमदार-खासदारांसमोर आमची कैफियत मांडणे, न्यायालयात दाद मागणे, आक्रोश व्यक्त करणे, असे मार्ग आमच्यासमोर उरले आहेत. छगन भुजबळ म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांच्यात हिमंत असेल तर त्यांनी मंडल आयोगाला आव्हान देऊन दाखवावे. जरांगे पाटलांएवढी दुसरी ज्ञानी व्यक्ती देशात नाही. मंडल आयोगाला त्यांना विरोध करायचा असेल तर त्यांनी जरूर करावा आणि मंडल आयोगाला संपवण्याचे काम करून दाखवावे. दुसऱ्या बाजूला भुजबळांच्या या आव्हानावर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जरांगे पाटील यांनी काही वेळापूर्वी पुण्यातल्या मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी जरागे पाटील म्हणाले, आम्हाला आव्हान देऊ नका, अन्यथा काहीही होऊ शकते.






# आजपासून मनपातर्फे 'सुंदर माझी घरगुती बाग' स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेतर्फे माझी वसुंधरा व राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत शहर सुंदर व हरित करण्यासाठी माझे योगदान या थीमवर सुंदर माझी घरगुती बाग स्पर्धा घेण्यात येणार असुन यात घरी छोटी बाग असणाऱ्या/ नविन बाग तयार करू इच्छिणाऱ्या तसेच टेरेस गार्डन/किचन गार्डन असणाऱ्या किंवा तयार करू इच्छिणाऱ्या स्पर्धकांना यात भाग घेता येणार आहे. स्पर्धेत टेरेस गार्डन / किचन गार्डन व माझी अंगणातील बाग असे दोन भाग असुन दोन्ही स्पर्धांना प्रत्येकी ३ रोख व १० प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जाणार आहेत. १८ तारखेपासुन स्पर्धेत भाग घेण्यास नोंदणी सुरु झाली असुन नागरिकांना या स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळणार आहे. यात ५०० स्क्वे फुटपर्यत जागेत गार्डन किंवा बागेची निर्मिती करणाऱ्यांना छोट्या तर ५०० स्क्वे फुटच्या जागेस मोठ्या गटात समाविष्ट केले जाणार आहे. शहरातील वातावरण उष्ण आहे, या स्पर्धेच्या माध्यमातुन अधिकाधिक घरी बागेची निर्मिती होऊन शहरातील हरीत प्रमाण ( ग्रीन कव्हर ) वाढावे व पर्यावरणपुरक वातावरणाच्या निर्मितीत नागरिकांचा हातभार लागावा हा या स्पर्धेचा उद्देश असुन घरघुती बागेच्या निर्मितीने घराला सौंदर्य प्राप्त होण्याबरोबरच घर थंड राहण्यास देखील मदत होणार आहे. अधिक माहितीसाठी साक्षी कार्लेकर ८३२९१६९७४३ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. काय आहे टेरेस गार्डन - सामान्य जमिनीवर न राहता घराच्या टेरेसवर फुले किंवा भाजीपाला पिकवण्याची कला टेरेस गार्डनिंग म्हणून ओळखली जाते. टेरेस गार्डन तयार केल्याने घर थंड राहण्यास मदत होते, टेरेसवर वाढणारी सर्व झाडे सूक्ष्म वातावरण तयार करतात त्या ठिकाणचे तापमान कमी करण्यास मदत करतात. त्याचप्रमाणे भाजीपाला आणि स्वयंपाकासाठी लागणाऱ्या वनस्पतींची जिथं लागवड केली जाते त्या भागाला किचन गार्डन म्हटलं जातं. घरच्या बागेत, व्हरांडयात, बाल्कनीत, टॅरेसवर हे किचन गार्डन आपण करू शकतो. जागा भरपूर असेल तर पालेभाज्या, कंद, शेंगा, वेली, फळझाडे, भाज्या वगैरे लावता येतात.

## ड्रॅगनची माघार

आधुनिक केसरी

लडाखजवळच्या भारत-चीन सीमेवर गेल्या काही दिवसांपासून तणाव वाढला आहे. दरम्यान लडाखमधील स्थानिक मेंढपाळ आणि चिनी सैनिकांमधील वादाचा एक व्हिडीओ समोर आला आहे. चिनी सैनिक प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ  मेंढ्या चरणाऱ्या लडाखमधील मेंढपाळांना तिथून हुसकावण्याचा प्रयत्न करत असल्याचे या व्हिडीओमध्ये दिसत आहे. चिनी सैनिक मेंढपाळांना तिथून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत होते तर, मेंढपाळदेखील निर्भयपणे त्यांना तोंड देत होते. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या संघर्षानंतर स्थानिक मेंढपाळ आणि पशुपालकांनी या परिसरात जनावरे चरण्यासाठी नेणे बंद केले होते. परंतु, आज (३१ जानेवारी) लडाखमधील काही मेंढपाळ भारताच्याच हद्दीत मेंढ्या चरण्यासाठी घेऊन गेले होते. त्यावेळी मेंढपाळ आणि चिनी सैनिकांमध्ये संघर्ष झाल्याचं पाहायला मिळालं. प्रत्यक्ष सीमारेषेजवळच्या कुरणांमध्ये मेंढ्या चरायला नेणाऱ्या मेंढपाळांना चिनी सैनिकांनी तिथून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी लडाखी मेंढपाळांनी चिनी सैनिकांना निक्षून सांगितले की, 'ही भारताची हद्द आहे'. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ लडाखच्या पूर्व भागातला असल्याचं सागितलं जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर भारतीय लष्कराने या परिसरातील सुरक्षा वाढवली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पूर्व लडाखमधील स्थानिक पशुपालकांनी एलएसीजवळच्या भागात गुरे चरायला नेणे बंद केले होते. पूर्व लडाखमधील पशूपालकांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ गुरे चरायला नेण्याची ही गेल्या दोन वर्षांमधली पहिलीच घटना आहे. दरम्यान, यावेळी भारतीय पशूपालकांनी या जमिनीवर आपला हक्क सागितला. त्याचबरोबर चिनी सैन्याला माघार घ्यायला लावली. पूर्व लडाखच्या चुशूलमधील नगरसेवक कोंचोक स्टॅनजिन यांनी मेंढपाळ आणि चिनी सैनिकांमधील वादाचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर शेअर केला आहे. तसेच या मेंढपाळांचे कौतुक केले आहे. मेंढपाळांनी दाखवलेल्या हिंमतीबद्दल त्यांची पाठ थोपटली आहे. तसेच मेंढपाळांच्या पाठिशी उभ्या राहिलेल्या भारतीय सैनिकांचेही आभार मानले. स्टॅनजिन यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, पशूपालकांनी पूर्व लडाखच्या सीमावर्ती भागात म्हणजेच पँगॉन्गच्या उत्तरेकडील किनारी भागात असलेल्या कुरणांवर हक्क सांगितला, त्यांची गुरे तिथे चरण्यासाठी नेली, त्याचवेळी भारतीय लष्करही त्यांच्या पाठिशी उभे होते. हे सगळे पाहून आनंद झाला. इतके चांगले नागरी-लष्करी संबंध राखल्याबद्दल सीमावरती भागात राहणाऱ्या भारतीय नागरिकांचे आणि या नागरिकांची हित जपल्याबद्दल भारतीय लष्कराचे मी आभार मानतो.

## प्रा. राजेंद्रसिंह : जीवनकार्याचा संदेश

आधुनिक केसरी

**प्रा. राजेंद्रसिंह हे रज्जूभय्या या नावाने ओळखले जात. एकात्मता मानवता वाद हा त्यांच्या हिंदुत्त्वाचा प्राण होता. त्यांनी विज्ञाननिष्ठ मानवतावादी निष्ठेने समाजातील सर्व घटकांनी सेवा केली. निरंतर मानवीसेवा हा त्यांचा जीवन संदेश होता.**


रज्जू भय्यांचे समग्र जीवन संघ कार्यामुळे व्यापलेले होते. त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काळानुरूप व त्यांच्या कतृत्वानुसार हे दायित्व सोपविले, ते त्यांनी समर्थपणे



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

पेलविले. प्रांत प्रचारकापासून ते  राष्ट्रीय सर कार्यवाह पर्यंत अनेक महत्वाच्या पदावर त्यांनी निखळ सेवाभावी दृष्टीने आपले कर्तव्य पार पाडले. परिस्थिती प्रतिकुल, साधनसामुग्रीची वानवा, अपुरे मनुष्यबळ या सर्व संकटांवर मात करून एक वैज्ञानिक व शास्त्रीय दृष्टीकोन ठेवला. उत्तर प्रदेशात संघ कार्याचा सर्वदूर प्रचार केला. आजच्या संघ कार्याची भक्कम बैठक त्यांच्या दूरदृष्टीतून साकारली आहे.

१९४९ साली त्यांनी संघदृष्टीने दोन-तीन विभागांना एकत्र करून बनविलेल्या संभागाचे कार्यवाह म्हणून दायित्व निभवले. १९५२ मध्ये त्यांनी प्रांत कार्यवाह व १९५४ मध्ये भाऊराव देवरस यांनी उत्तरप्रदेशमधील आपल्या कार्याला विराम दिल्यानंतर, त्यांच्या जागी पूर्ण प्रांताचे दायीत्व ते सांभाळू लगले. १९६१ मध्ये भाऊराव पुन्हा परतले, तेव्हा रज्जूभैय्यांना प्रांत प्रचारक हे दायीत्व त्यांना परत दिले. ते सह प्रांतप्रचारक या रूपाने आपले कार्य करत राहिले. भाऊराव देवरस यांनी सर्वस्वाचे समर्पण करून उत्तरप्रदेशात संघ वाढविला. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून रज्जूभैय्यांनी संघकार्याचा विस्तार केला. १९६२ ते १९६५ या काळात उत्तरप्रदेशचे प्रांत प्रचारक म्हणून त्यांनी संघटनकार्याला नवी दिशा दिली. १९६६ ते १९७४ ह्या काळात ते क्षेत्रप्रचारक ह्या पदावर राहिले. हे दायित्व उत्तमप्रकारे सांभाळल्यानंतर १९७५ ते १९७७ पर्यंत आणीबाणीच्या काळात त्यांनी भूमिगत राहून लोकशाहीच्या पुनरागमनासाठी जोरदार आंदोलन चालवले. आणीबाणीनंतर १९७७ साली ते सहकार्यवाह पदावर पोहोचले. मार्च १९७८ मध्ये माधवराव मुळे यांचे सरकार्यवाह हे दायिव सुद्धा त्यांच्यावर सोपवण्यात आले. १९७८ ते १९८७ एक दशकभर हे दायित्व त्यांनी उत्तप्रकारे निभवले. १९८७ मध्ये ते शेषाद्री यांना हे दायीत्व सोपवून सहकार्यवाह या रूपाने त्यांचे सहयोगी बनले. १९९४ मध्ये तत्कालीन सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी आपल्या वाढत्या आजारपणामुळे उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू केला तेव्हा सर्वांचेच लक्ष रज्जूभैय्या यांच्याकडे वेधले गेले. त्यावेळी सरसंघचालकाचे दायित्व निभविण्यासाठी ते सक्षम आणि समर्थ आहेत हे सर्वांनी मान्य केले. २१ मार्च १९९४ रोजी बाळासाहेब देवरस यांनी त्यांच्याकडे संघाच्या सर्वश्रेष्ठ सरसंघचालक पदावर काम करण्यासाठी त्यांची एकमताने शिफारस केली. संघाच्या इतिहासात ही एक असामान्य घटना होती. प्रसारमाध्यमे आणि समिक्षकांचे लक्ष त्याकडे वेधले गेले. परंतु बाळासाहेबांना प्रगाढ विश्वास होता की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आता अखिल भारतीय व वैश्विक संघटन झाल्यामुळे केवळ महाराष्ट्रापुरते संघटन मर्यादित ठेवून चालणार नाही. संघाचे व्यक्तिमत्व सर्वसमावेशक व राष्ट्रीय व्हावे म्हणून शिखर पदावर उत्तरभारतातील अष्टपैलू नेतृत्व गरजेचे आहे, हे ओळखून सर्वसंमतीने अखिल भारतीय प्रतिनिधीसभेने रज्जूभैय्यांची निवड केली. अहर्निश



परिश्रम, समाजकार्याची सैद्धांतीक व व्यवहार्य दृष्टी यामुळे राजेंद्रसिंह यांनी आपल्या कार्यकाळात संघाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. १९९९ मध्ये त्यांनी कार्याला प्रारंभ केला व अल्पावधीत संघटनेत नवचैतन्य आणले. सहकाऱ्यांच्या आग्रही इच्छाशक्तीचा सन्मान करून त्यांनी कार्य केले. आपल्या संघटनचातुर्याचा संघावर ठसा उमटविला. मार्च २००० मध्ये त्यांनी सुदर्शन यांच्यावर सरसंघचालक पदाची जबाबदारी सोपवून स्वेच्छेने पुढील जीवनकार्य करण्याचा आदर्श प्रस्थापित केला.

**जीवनकार्याचा संदेश :** प्रा.राजेंद्रसिंह यांच्या कार्यकाळात संघ आणि विश्वहिंदू परिषदेचे कार्य विविध शाखा विस्तार केले. संघटनेचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास झाला. साठ वर्षांची त्यांची प्रदीर्घ संघकार्याची यात्रा हेच सांगते की, उत्तण असो वा दक्षिण संघस्वयंसेवक राष्ट्रासाठी एक पाऊल पुढे ठेवण्यास नेहमीच सज्ज आहे. एकानंतर एक मोठे दायित्व स्वीकारणे आणि ते पार पाडणे हे त्यांच्या यशाचे सूत्र होते. १९४३ ते १९६६ ह्या काळात प्रयाग विद्यापीठात अध्यापनाचे कार्य करत असताना एक पूर्णवेळ प्रचारकाप्रमाणे यत्र-तत्र सर्वत्र संचार करत ते भविष्याचा शोध घेत होते. संघकार्यासाठी आपल्या पूर्ण क्षमतांचा विकास करत होते. १९४७ मध्ये त्यांनी नगरकार्यवाह म्हणून दायित्व स्वीकारले. १९५४ मध्ये बरेलीच्या संघशिक्षावर्गात त्यांच्या कुशल नेतृत्वाची साक्ष भाऊराव देवरस यांना पटली. त्यांच्यावर प्रांताची जबाबदारी सोपवण्यात आली. १९५७ मध्ये ते तृतीय वर्ष शिक्षीत झाले आणि उत्तरप्रदेशसारख्या विशाल प्रांताची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. संघाच्या स्वयंसेवकासमोर आपल्या निरलस सेवेचा आदर्श ते सतत ठेवत असत. प्रयाग विद्यापीठात अध्यापनाचे कार्य करत असताना 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या विचाराने संघप्रचाराचे कार्य करत असत. काया-वाचा-मने त्यांनी संघकार्याचा अनुभव घेतला. नवनवीन सेवाकार्याची पदे घेताना ते निष्ठेने काम करत. भौतिकशास्त्र या विषयात त्यांची विलक्षण गती होती. एक कुशल अध्यापक म्हणून ते आपल्या शिष्यांमध्ये लोकप्रिय होते. संशोधनकार्यात ते सतत मग्न असत. आपल्या सहकाऱ्यांमध्ये ते सदैव लोकप्रिय असत. अनेक वर्षे अध्यापन करून आपण प्रोफेसर व्हावे अशी लालसा त्यांना कधीही वाटत नसे. 'रीडर' हे पद त्यांच्या कामामुळे त्यांच्याकडे चालत आले. त्यांनी त्या पदासाठी अर्ज केला नव्हता. ते म्हणाले होते, 'माझे जीवनकार्य तर संघकार्य आहे. विश्वविद्यालयाचे प्राध्यापक पद मी समर्थपणे पार पाडले. संघकार्यासाठी वेळ आणि सेवा देताना त्यांनी आपल्या अध्यापक-संशोधनकार्याकडे दुर्लक्ष केले नाही. राजेंद्रसिंह कुशल अध्यापक, संघटकही होते. त्यांचे संपूर्ण जीवन 'शिक्षण आणि संघकार्य' ह्या दोन मंत्रावर आधारलेले होते. आपल्या विद्यापीठात त्यांनी आपल्या कार्याचा सुगंध कस्तुरीप्रमाणे पसरविला. समाजकार्य, खेळ तसेच सेवाकार्य यात ते सदैव आघाडीवर असत. 'राष्ट्रधर्म प्रकाशन' चे कार्य आर्थिक संकटात असताना त्यांनी उत्तमप्रकारे स्वतः च्या सहाय्यातून चालवले. आपल्या वेतनातील अंश त्यांनी संघासाठी व समाजासाठी वापरला.

**समारोप :** अमेरीकेत विश्वहिंदू परिषदेने आयोजित केलेल्या विराट हिंदू संमेलनास मार्गदर्शन करताना रज्जूभैय्या म्हणाले होते, "जगातील हिंदूंनो एक व्हा. तुम्ही काहीही गमावणार नाहीत. तुमच्या पायातील गुलामगिरीच्या शृंखला गळून पडतील." मार्क्सच्या विधानात थोडासा बदल करून त्यांनी दिलेली ही हाक हिंदुत्वाला वैश्विक प्रतिमा प्राप्त करून देणारी ठरली. त्यातून जगातील हिंदूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. 'निःस्वार्थ सेवा व निष्काम सेवा' हा गीतेचा संदेश त्यांनी कृतीमध्ये आणला. पुरुषोत्तमदास टंडन, प्रभुदत्त ब्रह्मचारी तसेच लालबहाद्दूर शास्त्री यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या संपर्कात येऊन त्यांनी त्यांचा विश्वास संपादन केला. ते नेहमी यथार्थ परोपकारी व सकारात्मक दृष्टीने विचार करत. एखाद्या योगीराजाप्रमाणे निःस्वार्थ सल्ला देत असत. मोरारजी देसाई यांच्या मंत्रीमंडळात नानाजी देशमुख यांच्याकडे उद्योगमंत्री हे पद आले असताना रज्जूभैय्यांनी, 'आपण जर बाहेर राहून संघटन कार्य केले तर बरे राहील, तुम्ही सरकारात गेलात तर संघटनकार्य कोण सांभाळणार' असा सल्ला दिला व नानाजींनी मंत्रीपदाचा त्याग केला. दत्तोपंत ठेंगडी यांच्यासारखे श्रेष्ठ नेतेसुद्धा त्यांच्या मताचा आदर करत असत. त्यांच्या मतामध्ये कधीही कोणताही डावपेच, कुटीलता, अहंकार याचा स्पर्श नसे. ते एक नैतिक व आध्यात्मिक शक्तीचे दिव्य व्यक्तीमत्व होते. केवळ संघातच नव्हे तर भारताच्या सार्वजनिक जीवनात ते एक युगीन चैतन्य होते. ध्येयनिष्ठा, संकल्प, आदर्शवाद यांनी युक्त असे एक आदर्श, विज्ञाननिष्ठ व्यक्तिमत्व म्हणून त्यांनी संघकार्याला नवी दिशा दिली. त्यांच्या जीवनावर क्रांतीकारक रामप्रसाद बिस्मील शर्मा यांचा विलक्षण प्रभाव होता. त्यांचे भव्य स्मारक राजधानीत व्हावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. रज्जूभैय्या हे एक समाजसुधारक, सर्वसमावेशक आणि विज्ञान व संस्कृतीमधील समन्वयाचे मूर्तीमंत प्रतीक होते. तरूण विजय यांनी म्हटल्याप्रमाणे, 'रज्जूभैय्या हे एका ध्येयवादी पीढीचे प्रतिनिधी होते. त्यांच्या दीपस्तंभाचा प्रकाश त्यांच्या रूपाने प्रकट झालेल्या एकात्म मानवतावादी हिंदुत्वमानवाचा हा दीपस्तंभाचा प्रकाश सदैव प्रेरणा देत राहील. बिस्मील यांच्या शब्दात 'ही सरफरोशी की तमन्ना' तरुणांना राष्ट्रनिर्मितीचा सदैव नवा संदेश देत राहील. मदनलाल वर्मा, गोविंदाचारी आणि राम माधव यांच्या लेखनाचे सार असे आहे की, 'नवहिंदुत्वाची सर्वसमावेशक मांडणी करणारा एक महान दार्शनिक' असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. त्यांनी आपले जीवनकार्य पुणे येथील कौशिक आश्रमामध्ये शेवटचा श्वास घेतला. त्यांच्या विज्ञाननिष्ठ दृष्टीमुळे राष्ट्रीय जीवनावर अमीट ठसा उमटवू शकले.

## महात्मा गांधीजींना अभिप्रेत 'रामराज्य'




डॉ. प्रकाश खेत्री,
मुंबई, ७८४३०९२२४४

आधुनिक केसरी

**'माझ्या रामराज्यात राजापासून रंकापर्यंत सर्वांना समान हक्क असतील. - महात्मा गांधी. आज ३० जानेवारी महात्मा गांधी यांची ७६ वी पुण्यतिथी. भारतात हा दिवस "शहीद दिन" म्हणून साजरा केला जातो. गेल्या आठवड्यात आयोध्यात राममंदिर लोकार्पण सोहळा संपन्न झाला. आणि  देशात  पुन्हा एकदा राम, रामायण आणि रामराज्याच्या विचार मंथनला सुरूवात झाली. भारतात  विसाव्या शतकात राम आणि रामराज्याचा विचार मांडणारे महात्मा गांधी हे राजकीय नेते, अराज्यवादी व आदर्शवादी राजकीय विचारवंत होते. आजच्या या पार्श्वभूमीवर महात्मा गांधीजींचे "रामराज्य" संबंधीचे  विचार जाणून घेणे महत्वाचे वाटते. महात्मा गांधीजींना अभिप्रेत "स्वराज्य" तथा "आदर्श राज्य" हे "रामराज्य" आहे.**

गुन्हेगाराला  गुन्ह्यानूसार शिक्षा तर झालीच पाहिजे. तुरुंगात गुन्हेगारावर सुधारात्मक उपाय केले जावेत. असे गांधीजींचे मत होते. रामराज्यातील कायदे म्हणजे नैतिक नियम असतील, नागरिकांना उपासनेचे, विचारांचे आणि लेखनाचे स्वातंत्र्य असेल, खेडे समृद्ध, सुखी आणि स्वयंपूर्ण असतील. सत्य आणि अंहिंसा हा राज्याचा पाया असेल, ज्या राज्यात प्रत्येक व्यक्तीला निर्भयतेने आणि स्वतंत्रपणे राहता येईल, महात्मा गांधीजीनी खेडेगांव हे केंद्रबिंदू मानले. कारण गांधीजींच्या मते, "खरा भारत हा शहरात नसून खेड्यात आहे. खेड्यांना जास्तीत जास्त स्वायत्ता मिळावी. खेड्यांचा कारभार लोकांनी निवडून दिलेल्या पंचायतीमार्फत चालवावा. खेड्यांनी आपल्या जिल्हयाचा कारभार चालविणारी जिल्हा मंडळे निवडावीत. जिल्हा मंडळांनी प्रांतिक मंडळे, प्रांतिक मंडळांनी मध्यवर्ती मंडळ व त्याचा अध्यक्ष निवडावा अशी शासनव्यवस्था त्यांनी सुचविली." खेडयांना दिले जाणारे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य असेल. त्यांना पूर्णतः अधिकार असतील, सहकार आणि ग्रामपंचायतीच्या सहाय्याने राज्यकारभार चालविण्यात येईल. निवडणुकिसाठी उभे राहणारे उमेदवार हे निस्वार्थी भ्रष्टाचारापासुन मुक्त, चारित्र्यसंपन्न,



सेवावृत्तीचे असावेत असा गांधीजींचा  आग्रह होता. "आपण सुसंस्कृत झाल्याशिवाय आपले स्वराज्य निरर्थक आहे. आपण नैतिकतेला जीवनात सर्वोच्च स्थान द्यायला हवे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या जीवनात प्रामाणिकपणा आणि उच्च नैतिक मूल्ये जोपासली पाहिजेत." रामराज्य हे धर्माचे व न्यायाचे राज्य होते. अशा रामराज्याची स्थापना करणे हे महात्मा गांधींचे स्वप्नं होते. महात्मा गांधीजींवर राम आणि रामराज्याचा प्रभाव शेवटच्या क्षणापर्यंत होता. 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात लिहितात, लहानपणी भीती वाटलिकी ते राम मनामाचा जप करत, त्यांच्या संपूर्ण आयुष्यात 'मिशन टू मॉस्को' आणि  'राम राज्य' (१९४४ मध्ये) हे केवळ दोनच चित्रपट पाहिले होते, ३० जानेवारी, १९४८ रोजी दिल्लीत मृत्यू समय ' हे राम ' असे म्हटले तर नवी दिल्लीतल्या यमुना नदीच्या तीरावर राजघाट या समाधीस्थळी स्मृतिप्रीत्यर्थ आजही "रघुपती राघव राजा राम" हे त्यांचे आवडते भजन गायले जाते.  गांधीजींची रामराज्याची संकल्पना केवळ रामायणातील राज्याशी किंवा धर्माधिष्ठित राज्याशी संबंधीत नाही, तर त्यांची  वैश्वीक धर्मावर श्रध्दा होती. ते सर्व धर्मांच्या श्रध्दा, शिकवण यांचा आदर करीत असत. त्यांना अभिप्रेत  "रामराज्यात" सत्तेचे विकेंद्रीकरण होईल, खेडे स्वयंपूर्ण आणि स्वायत्त होतील. कोणत्याही व्यक्तीलाही इजा पोहचविणारा नाही, जिथे प्रत्येक आवाज ऐकला जाईल, न्याय वेगवान असेल, नीती व मर्यादेवर आधारीत शोषणविरहीत  समता मूलक समाज असेल. महात्मा गांधीजींचे हे विचार आजही शाश्वत आणि महत्वपूर्ण वाटतात. तेव्हा महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील रामराज्याची निर्मिती करण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करायला हवेत. हीच खऱ्या अर्थाने त्यांना श्रद्धांजली ठरेल...

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# छत्रपतींच्या शौर्याने गाजलेले गडकिल्ले ठरणार जागतिक वारसा!

## सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारात सांस्कृतिक विभागाकडून केंद्र सरकारकडे पाठवलेला प्रस्ताव युनेस्कोकडे सादर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे साक्षीदार ठरलेले महाराष्ट्रातील ११ व तमिळनाडू मधील १ असे १२ गडकिल्ले युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित झाले आहे. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी पाठविलेला प्रस्ताव केंद्र सरकारने स्वीकारला असून युनेस्कोकडे यासंदर्भात शिफारस केली आहे. 'मराठा लष्करी रणभूमी परिसर' म्हणून ओळख असलेल्या या १२ किल्ल्यांना युनेस्कोकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावात स्थान देण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविला होता. त्याचवेळी देशभरातील विविध राज्यांमधून केंद्र सरकारकडे प्रस्ताव आले होते. मात्र ना. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर केंद्र सरकारकडून महाराष्ट्राचा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठविण्यात आला आहे.

यामध्ये महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील जिंजी अशा १२ गडकिल्ल्यांना नामांकन देऊन जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामध्ये किल्ले रायगड, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, खांदेरी, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांचा समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे रणझुंजार कर्तृत्व आणि त्यांच्या शौर्याचे साक्षीदार ठरलेले हे सर्व किल्ले २०२४-२५ या वर्षासाठी जागतिक वारसा स्थळाच्या यादीत येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. युनेस्कोच्या वतीने सांस्कृतिक (कल्चरल) आणि नैसर्गिक (नॅचरल) अशा दोन कॅटेगरीमध्ये जागतिक वारसा स्थळांची यादी जाहीर केली जाते. यात महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांना सांस्कृतिक निकषात समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारने केली आहे. वैशिष्ट्यपूर्ण व अपवादात्मक सांस्कृतिक परंपरांची साक्ष देणाऱ्या वास्तूंचा या गटात समावेश केला जातो. यासोबतच मानवी शौर्याचा इतिहास सांगणाऱ्या या किल्ल्यांचे आर्किटेक्चर, इमारतीचे बांधकाम आणि त्यांची तांत्रिक बाजू देखील यामध्ये ग्राह्य धरली जाते. २०२१ मध्ये युनेस्कोने 'मराठा लष्करी रणभूमी परिसर' हा संभाव्य जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केला होता. त्यानंतर आता भारतातील ४२ जागतिक वारसा स्थळांमध्ये युनेस्कोने मराठा लष्करी रणभूमी परिसरातील १२ किल्ल्यांचा समावेश करावा, असा प्रस्ताव केंद्र सरकारने युनेस्कोकडे सादर केला आहे.



राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या अफलातून कार्यशैलीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांनी घेतलेल्या अनेक ऐतिहासिक निर्णयांमुळे ऐतिसाहिक वारसा आणि परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने सरकारने पाऊल टाकले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष साजरे करताना सांस्कृतिक कार्यक्रमांसह ऐतिहासिक परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने देखील त्यांनी पुढाकार घेतला. महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखे ब्रिटनच्या संग्रहालयातून भारतात आणण्याची जिद्द त्यांनी बाळगली. सातत्याने पाठपुरावा करून ब्रिटन सरकारसोबत त्यांनी सामंजस्य करार देखील केला. लवकरच ही वाघनखे दर्शनासाठी भारतात दाखल होणार आहेत. यासोबतच जम्मू-काश्मीर मधील कुपवाडा येथे मराठा इन्फन्ट्री सैन्य दलाच्या सहकार्याने 'आम्ही पुणेकर' या संस्थेमार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाकिस्तानच्या दिशेने तलवार धरलेल्या पुतळ्याचे देखील काही दिवसांपूर्वी अनावरण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या श्रीशैलममध्ये तपश्चर्या केली, तिथे महाराजांचे एक छोटे मंदिर होते. सरकारने तिथे भव्यदिव्य मंदिर उभे केले. २९ जुलै १९५३ नंतर पहिल्यांदा अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण सरकारने हटवले.




# क्षेत्र अडबंगीनाथ तपोभूमीत धर्मबीज सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** नवनाथांपैकी एक अडबंगीनाथ महाराज यांची जन्मभूमी व तपोभूमी असलेल्या, श्री गोरक्षनाथ मंदिर धामोरी ता.कोपरगाव येथे धर्मबीज निमित्त शनिवार दि.३फेब्रुवारी२०२४ ते दि.११ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले धामोरी नवनाथ संप्रदायाचे आदीपीठ असुन अडबंगीनाथाचे जन्मस्थान व तपोभुमी आहे. नवनाथ ग्रंथामध्ये अध्याय ३४ वा, ओवी क्र.६२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री गोरक्षनाथांनी अडबंगीनाथाना दिक्षा देऊन आपल्या पदस्पर्शाने हे स्थान पुनीत केले आहे. येथे अडबंगीनाथांनी बारा वर्षे तप केले आहे. या जागेवर नवनाथाचे भव्य मंदीर व जगाच्या पाठीवर कुठेही नाही असा नऊ विराट फांद्यांचा वृक्ष हा गोरक्षचिंच म्हणुन प्रख्यात आहे. या वृक्षास येणारे फळ हे नारळा सारखे



आकाराचे असते. अत्यंत प्राचिन आयुर्वेद शास्त्राधारे सदरच्या गोरक्षचिंचेची पाने, फळे व साल हे बहुरोग नाशक म्हणुन प्रसिध्द असुन भाविकांना त्याचा लाभ मिळतो. हा प्राचीन वृक्ष बघण्यासाठी अनेक भक्त येत असतात. सालाबादप्रमाणे धर्मनाथ बीज सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. शनिवार दि.३ फेब्रुवारी २०२४ ते दि.११ फेब्रुवारी २०२४ दररोज सकाळी श्री नवनाथ ग्रंथाचे पारायण, शुक्रवार दि. ९ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत वकील राजेंद्र बदामे यांच्या शुभहस्ते शनिदेव अभिषेक, सांय. ५ ते ६ यावेळेत ह.भ.प.मधुकर महाराज गडाख यांचे प्रवचन, शनिवारदि.१० फेब्रुवारी दुपारी ४ ते ६ प.पु. संतश्री दत्तानंदगिरी महाराज यांचे प्रवचन, रविवार दि.११ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वा.प.पु.संतश्री दत्तागिरी महाराज यांच्या हस्ते

श्री नवनाथ ग्रंथपूजन होईल. सकाळी ८ ते ९ वेळेत भिक्षा फेरी व श्री नवनाथ पालखी मिरवणूक, कलश पुजन, सकाळी १० वा. ह.भ.प. शिवाजी महाराज भालुरकर यांचे किर्तन होईल. सकाळी ११.४३ वा. प.पु.गुरुवर्य संतश्री रमेशगिरीजी महाराज हे अमृतसंदेश देतील. त्यानंतर पुरातन काळापासून चालत आलेल्या आमटी भाकरेचा महाप्रसाद होईल. यावेळी खा. सुजय विखे, खा.सदाशिव लोखंडे, आ. आशुतोष काळे, विवेक कोल्हे, मनेश गाढे, सुधाकर दंडवते, दत्तात्रय पाटील यांच्या शुभहस्ते कलशपूजन होईल. या धर्मनाथ बीज सोहळ्यासाठी भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन विजय जाधव, विश्वास जाधव, सौ विमल बोरसे, बाबासाहेब मांजरे, राहुल जाधव, अभिजीत जाधव, बाळकृष्ण मांजरे, विद्याताई पाटील, विलासी कदम, ऐश्वर्य दिघे, चेतन कदम, विजयमाला खैरनार, राधिका पाटील, गोरक्ष बोरसे, विश्वावती काळे, रागिणी देशमुख, अडबंगीनाथ सेवा भक्त मंडळ, गोरक्षनाथ सेवा मंडळ, श्री स्वामी समर्थ सेवेकरी, आनंदवल्ली मित्र मंडळ, जाणता राजा मंडळ, ए वन मंडळ, न्यु इंग्लिश स्कूल शाळा, के.बी. रोहमारे महाविद्यालय सर्व ग्रामस्थ व भजनी मंडळ यांनी केले आहे.

# अवैध धंदे बंद करण्यासाठी अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** रायचिखली पोलिस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे बंद करा व त्यांना पाठबळ देणारे पोलिस अधिकारी कर्मचारी यांच्यावर कायदेशिर कारवाई करावी या साठी अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे युवा प्रदेशाध्यक्ष पुरुषोत्तम बोर्डे व पत्रकार इसरार देशमुख हे दि. २६ जानेवारी पासून जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालया समोर बेमुदत आंदोलन करीत आहेत. मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्याला मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, तसेच जिल्ह्याचे नाव जगभर प्रसिद्ध आहे असे असताना बुलढाणा पोलिस प्रशासनाच्या भ्रष्ट वृत्तीमुळे फार कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहे. शहरातील चर्च समोर,जयस्तंभ चौक ते गॅरेज लाईन,सुवर्ण गणेश मंदिर समोर टाटा ग्राउंड मध्ये,इकबाल चौक, सुंदरखेड येथील होंडा शो रूम जवळ, बजार गल्लीतील शासकीय गाळ्यात,सार्वजनिक बांधकाम विभाग समोर, रायपूर,सैलानी, देऊलघाट,चिखली पोलिस स्टेशन हद्दीत शहरातील मध्यवस्तीत बाजार मार्केट येथे खुले आम, वरली, मटके, जुगार अड्डे, नगदी तकदिर का बादशहा असे एक नव्हें अनेक अवैध धंदे जोमात सुरू आहेत या मुळे तरुण पिढी बरबाद होत आहे,अनेक कुटुंबाचे संसार उघड्यावर पडले आहेत, अनेक तरुण व्यसनी बनवण्यास सुरुवात झाली आहे, अनेक व्यक्ती गुंड मोकाट फिरत आहेत, दिवसा ढवळ्या लुटमार होत आहे,अनेक महिलांचे दागिने खुलेआम पळविले जात आहेत त्या मुळे पोलिस अधिकारी कर्मचारी यांचा वचक राहिलेला नाही,गावगुंड बाजार मार्केट मध्ये मोबाईल फोन चोरत आहे, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते यांनी अनेक आंदोलन केले, निवेदन दिले मात्र येथील भ्रष्ट पोलिस प्रशासन आधिकारी कोणतीही कार्यवाही करत नाहीत, उलट तक्रार दाखल करणाऱ्यास धमकी देऊन तक्रार माघे घेण्यास प्रवृत्त केले जाते,त्या मुळे सर्बंधित पोलिस स्टेशन आधिकरी कर्मचारी यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर तत्काळ कारवाई करावी व राय चिखली, बुलढाणा पोलिस स्टेशन हद्दीतील सर्व अवैध धंदे, जुगार अड्डे, वरली,मटका बंद करावा, अशी मागणी पुरुषोत्तम बोर्डे, इसरार देशमुख यांनी केली आहे तर उपोषण मंडपाला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी भेट देऊन पाठिंबा देत आहे या मध्ये राष्ट्रवादी काँगेस पार्टी महिला जिल्हाध्यक्ष प्रा अनुजा सावळे, नाजिमा शेख, भजप नेते माजी आमदार विजराज शिंदे, अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश डोंगरे, एमआयएम चे जिल्हाध्यक्ष डॉ मोबीन खान यांच्या सह विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी पाठिंबा देत आहेत.



# अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** हद्दीत अवैध धंद्याची माहीती काढून स्वस्तिक टॉवर व हळदी गल्ली येथे चालु असलेला अवैध जुगार अड्यावर महाराष्ट्र जुगार कायदान्वये छापा मारुन कारवाई करण्यात आली असून या प्रसंगी खिरुद्दिन नसोरुद्दिन शेख रा.गवडी गल्ली, राजु रामचंद्र राजपूत, रा.सटाणा, गणेश तान्हाजी चाफेकर, रा. रामवाडी, आनंद राजपूत, रा. परदेशी गल्ली, अनिल माने, रा.गंगापुर, गोरख साळुंके वय ५४ वर्ष रा. घायगाव, आसाराम शेजवळ, रा.शिवराई, रमेश धाडबळे, रा.कनकसागज, बबन बागुल, रा.उक्कडगाव, बाबासाहेब त्रिभुवन, रा. फूलेवाडी रोड, माधव जगताप, दादाराव सोळसे वय ४० वर्ष रा. मोंढा,मुरलीधर भागाजी मालकर वय ७० वर्ष रा. सटाणा,गणेश अरुन राजपुत वय ४० वर्ष रा. निवारा नगरी,अय्युब रज्जाक शेख, बाबुराव काकडे वय ६० वर्षे रा. खंडोबानगर, रमेश लक्ष्मण वाघमारे वय २८ वर्षे रा. कादरी नगर,शेख जमील शेख खलील, अजगर अकबर सय्यद वय ५८ वर्ष रा इंदिरानगर, वाल्मीक रुपचंद राजपूत वय ४६ वर्ष रा जाधव गल्ली,नंदू महाले,नितीन मल्हारराव लांडे वय ४७ वर्षे रा. नायगाव ता. श्रीरामपुर, शाहू भीमसेन साठे वय ७४ वर्षे रा. जांबरगाव, विठ्ठल त्रिंबक साठे वय ६१ वर्षे रा. जांबरगाव, दिनकर सोपन शेजवळ वय ४९ वर्षे रा. जाबरगाव, सोमनाथ लक्ष्मण साळुंके वय ४६ वर्षे रा.घायगाय, आसाराम रामकिसन पगारे वय ६९ वर्ष रा. शिवूर,संजय बापू सोनवणे वय ४२ वर्षे रा. जियनगंगा कॉलनी,अंकुश राजकुमार श्रीवास्तव वय ३३ वर्षे रा. फुलेवाडी रोड, बाबासाहेब कचरु पठारे वय ३८ वर्षे रा. खंडोबानगर, मदन ज्ञानदेव सोमवंशी वय ४० वर्षे रा. म्हस्की,प्रविण जगन्नाथ वाघ वय ३५ वर्षे रा.बजरंग चौक सर्व राहणार वैजापूर शहर व ग्रामीण मधील असून यांच्या विरुद्ध कलम ४,५,१२(अ)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाई मध्ये मोटार सायकल, मोबाईल,संगणक व नगदी असा एकुण ३,४४,५३० /- रुपये किंमतीचा माल हस्तगत करुन कायदेशीर गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोलीस ठाणे वैजापूर करत आहेत.

# मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारांविरोधात कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश कांबळे**

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेने मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारांविरोधात पुन्हा दंडात्मक कारवाई करून दुकाने सील करण्याचा इशारा अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी दिला. तसेच मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारांकडून दिवसाला २ हजार रुपये दंड ठोठावून दुकाने सील करण्याचा निर्णय घेतल्याने दुकानदार व महापालिका आमने- सामने येण्याची शक्यता निर्माण झालीं आहे.

उल्हासनगर महापालिकेने शासन व न्यायालयाच्या आदेशानुसार दुकानदारांसह इतर आस्थापनाना मराठी भाषेत मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारांना नोटिसा देऊन कारवाईचे संकेत दिले होते.

मात्र त्यानंतरही बहुतांश दुकानदारांनी ठळक अक्षरात मराठी नावाच्या पाट्या न लावल्याने, मनसेच्या पदाधिकार्यांनी मनसे स्टाईलने कारवाईचा इशारा दिला होता. महापालिकेच्या आवाहनाला दुकानदारानी सहकार्य केले नसल्याने, अखेर महापालिका अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्यासह महापालिका अधिकारी रस्त्यावर उतरून मराठी



पाट्या न लावणाऱ्या दुकांदारावर सहा दिवसांपासून दंडात्मक कारवाई सुरू केली असून सदर कारवाई सुरू ठेवली आहे. उल्हासनगर महापालिका आयुक्त अजिज शेख यांच्या आदेशाने, मराठी पाट्या न लावणाऱ्या विरोधात अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, उपायुक्त अशोक नाईकवाडे, प्रभाग अधिकारी गणेश शिंपी, दत्तात्रय जाधव, जेठानंद व अनिल खतुरानी आणि व परवाना विभागाचे विभाग प्रमुख विनोद केणे आदींच्या पथकाने दुकानदारांवर कारवाई सुरू केली. जो कोणी शासनाच्या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली णी करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करणार, त्याच्यावर एक लाख रुपयांपर्यंत दंडासह शिक्षेची तरतूद असल्याचे संकेत महापालिका अधिकाऱ्यांनी दिले.

महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ३१३ अन्वये कारखाने व धंदे इत्यादीसाठी व कलम ३७२ ते ३८६ मधील तरतुदीनुसार परवाना फी घेवून परवाना घेणे आवश्यक असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त लेंगरेकर यांनी दिली आहे. दुकानदारांसह शासकीय व निमशासकीय आस्थापनाने ठळक अक्षरात मराठी पाट्या न लावण्याऱ्या विरोधात महापालिकेने दंडात्मक ची कारवाई सुरू केली. या करवाईतून लाखोंचा दंड वसूल झाला असून दुकाने सील करण्याचा निर्णयही महापालिकेने घेतला आहे.

# सोयाबीन खरेदी केंद्रे ओस, व्यापारी शेतकरी अडचणीत

## सोयाबीन हमीभावापेक्षा कमी, तूर खातेय भाव

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** नविन वर्षाच्या सुरूवातीपासूनच सोयाबीनच्या दरात चांगलीच घसरण दिसून येत आहे. तर यंदा तुरीला चांगलाच भाव मिळत आहे. सोयाबीनचे भाव कमी झाल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी, व्यापारी अडचणीत आले आहेत.

मागील महिन्यापासुन सोयाबीन भाव कमी कमी होऊन चार हजारावर येऊन ठेपले आहेत.त्यामुळे बाजारातील सोयाबीन आवक ठप्प झाली आहे.

असे असले तरी यंदा कधी नव्हे ते तूर उत्पादक शेतकऱ्यांना 'सुगी'चे दिवस आल्याचं सध्याचं चित्रं आहे. मात्र, बाजारातील आवक वाढल्यानंतर महिनाभरात भाव स्थिर होऊन पुन्हा तुरीला सरासरी नऊ हजार ते 10 हजार रूपये दर मिळतं आहे.

मागील दोन वर्षांपासून सोयाबीनला चांगला भाव मिळतं असल्याने दरवर्षी गतवर्षीच्या तुलनेत सोयाबीनचा पेरा वाढत आहे. अतिरिक्त सोयाबीन पेऱ्यामुळे इकडे सोयाबीनचे भाव पडणे तर तुरीचा कमी झालेला पेरा त्यात तूर भाव वाढ यामुळें तूर भाव वाढ होऊनही त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत नसल्याचं चित्रं बाजारात दिसत आहे.

शेतकऱ्यांनी काळाची पावले ओळखून "विकेल ते पिकले"या धर्तीवर शेती करणे गरजेचे आहे.



# अंगणवाडी सेविकांना मोबाईल फोनचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार ग्रामपंचायत अंतर्गत महिला बाल विकास अंतर्गतचा निधी अंतर्गत वडोद बाजार, वडोद खुर्द व भालगाव अंगणवाडी सेविकांना व आशा सेविकांना मोबाईल फोनचे वाटप करण्यात आले. वडोद बाजार ग्रामपंचायत कडून धर्म शाळेत अंगणवाडी सेविकांना, व आशा सेविका याना मोबाईल फोनचे वाटप यावेळी वाडी येथील अशोक गिरी महाराज,वडोद बाजारचे उपसरपंच गोपाळ वाघ, साबेर पठाण ग्रामपंचायत सदस्य शेख राजीक ,बाबुराव मंदाडे , डॉ सुहास वायकोस ,काकाजी कोलते, शुभम गंगावणे, चेअरमन कडूबा म्हस्के, शामराव दुधे, अशोक शिनगारे, आसाराम कोलते, अरूण वायकोस, साहेबराव खाकरे, दोलत वाघ, रमेश वाघ, ग्रामपंचायत कर्मचारी व गावकरी आदी सह अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या वडोद खुर्द ,(वाडी) येथे होणाऱ्या महायज्ञ सोहळ्यासाठी वडगाव येथील ग्रामस्थांनी सहकार्य करावे व या यज्ञ सोहळ्यासाठी उपस्थित राहावे असे आव्हान वाडी येथील संस्थांचे अशोक गिरी महाराज यांनी केले.



# धाराशिव जिल्ह्यातील ज्योती क्रांती मल्टिस्टेटचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील ज्योती क्रांती मल्टिस्टेट13वा वर्धापन दिन मोठया थाटामाटात साजरा करण्यात आला. ज्योती क्रांती मल्टिस्टेट शाखेच्या वाशी शहरातील तेराव्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये तालुक्यामधील 51रक्तदात्यांनी रक्तदान केले. हा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी बँक मॅनेजर महेश हरिभाऊ कुंभार, हिशोबनिस क्रांती अशोक गपाट, तसेच बँक कर्मचारी युवराज चौधरी, राहुल घुले, बालाजी क्षीरसागर, विलास मोळवणे, तांबोळी रशीद यांनी मोलाचे सहकार्य केले.



# एम.आय.टी. रोटेगाव येथे 'पंचरंग-2 के 24' चे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** एम.आय.टी.पॉलिटेक्निक रोटेगाव येथे नुकतेच राज्य स्तरीय टेक्निकल स्पर्धा "पंचरंग-2के24"चे आयोजन करण्यात आले होते. विविध पॉलिटेक्निक संस्थांमधून 333 विद्यार्थी संघांनी यात सहभाग नोंदविला. याप्रसंगी वैजापूर येथील श्रीनाथजी बिल्डकॉनचे डायरेक्टर हरीश पालेजा व अरुजीत कन्स्ट्रक्शन्सचे डायरेक्टर मितेश पालेजा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हरीश पालेजा यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना तंत्र शिक्षणातील कौशल्ये आत्मसात करण्यावर भर देण्याचे आवाहन करून शिक्षणाची संधी केवळ एकदाच मिळते, असे सांगितले.तर एम.आय.टी. बी.टेक. छत्रपती संभाजीनगर येथील प्रा. डॉ. बी.एस. सोनवणे यांनी अध्यक्षीय समारोप करतांना, विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविण्यावर भर दिला. तसेच यावेळी संस्थेचे माजी विद्यार्थी व सध्या वैजापूर येथील भाग्योदय ऍग्रो इंडस्ट्रीज च्या माध्यमातून स्वतःची एक यशस्वी उद्योजक म्हणून ओळख निर्माण केलेले अनुप पहाडे यांनी विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगारावर लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला दिला. ॲग्रिकल्चरल इंजिनीअरिंग विभागातर्फे ‘सायंटिफिक पोस्टर प्रेसेंटेशन’चे आणि आयोजन करण्यात आले होते. यात वैभवी ठाकरे, संध्या सोनवणे यांनी प्रथम, जवेरीया सय्यद, अंजली थोरात यांनी द्वितीय, गौरी साखळे, साक्षी कोल्हे यांनी तृतीय आणि साक्षी हिंपळनेरकर, आम्रपाली खरात (सर्व एम.आय.टी.छत्रपती संभाजीनगर) व गायत्री जाधव, साक्षी सोनवणे यांना (अशोक पॉलिटेक्निक) उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. सिव्हिल इंजिनीअरिंग विभागातर्फे 'ब्रिज क्रिती'चे आयोजन करण्यात आले होते. यात ओंकार खैरे याने प्रथम, सोहम साळुंके (एस.एन.डी.येवला) याने द्वितीय, गायत्री वाघ (एम.आय.टी.रोटेगाव) हिने तृतीय आणि तनुजा कहाटे (एम. आय.टी.रोटेगाव), अमोल जाधव (एस.एन.डी.येवला) यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. कंप्युटर इंजिनीअरिंग विभागातर्फे 'वेब-डिझायनिंग'चे आयोजन करण्यात आले होते. यात रोहन गायकवाड (एम.आय.टी.रोटेगाव) याने प्रथम, अनुराग यादव, सर्वेश नाईक (एम.आय.टी.छत्रपती संभाजीनगर) यांनी द्वितीय, अजय पठारे, ओम नागरे (एम.आय.टी.रोटेगाव) यांनी तृतीय आणि शंतनू शहाणे, तन्मय जोशी (एम.आय.टी.छत्रपती संभाजीनगर) व महेक शेख, ऋतुजा माहेर (एम.आय.टी. रोटेगाव) यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभागातर्फे 'टेक्निकल क्विझ'चे आयोजन करण्यात आले होते. प्रणील काबरा, ओजस देपुरी (एम.आय.टी.छत्रपती संभाजीनगर) यांनी प्रथम, नेहा चव्हाण, राधिका कोटकर (एम.आय.टी.रोटेगाव) यांनी द्वितीय, ऋषिकेश पराडकर, सौरभ श्रीखंडे (सी.एस.एम.एस.एस. छत्रपती संभाजीनगर) यांनी तृतीय आणि शिवप्रसाद मांजरे (एम. आय.टी.रोटेगाव), वैष्णवी भरड, समृद्धी भाले, वैष्णवी राऊत, रोशनी राठोड (सी.एस.एम.एस.एस. छत्रपती संभाजीनगर) यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभागातर्फे 'टेक्निकल पेपर प्रेझेंटेशन'चे आयोजन करण्यात आले होते. सर्वेश नाईक, ओजस देपुरी (एम.आय.टी.छत्रपती संभाजीनगर) यांनी प्रथम, रोहन चिंधे, रितेश रोकडे (एम. आय.टी.रोटेगाव) यांनी द्वितीय, सिद्धांत दंडवते, यश साळुंके, चेतन गायकवाड, संकेत चव्हाण (के.बी.पी.कोपरगाव), यांनी तृतीय आणि निकिता शिंदे, हामजा सय्यद (अशोक पॉलिटेक्निक), अपर्णा मतसागर, जयश्री भुजाडे (एम.आय.टी. रोटेगाव) यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. स्पर्धेतील सर्व विजेत्यांना संस्थेचे प्राचार्य प्रा.किशोर पाटील व सर्व विभाग प्रमुख यांच्या हस्ते प्रत्येकी प्रथम पारितोषिक म्हणून 1001/- रुपये, द्वितीय 701/- रुपये, तृतीय 501/- रुपये आणि दोन उत्तेजनार्थ 301/- रुपये सह स्मृतीचीन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विवेक जोशी व आभार प्रदर्शन प्रा. मनीषा जाधव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाच्या आयोजक प्रा.वैशाली जोशी, सर्व विभाग प्रमुख प्रा.सागर शहाणे, प्रा.स्वप्निल पाठक, प्रा.एस.राम, प्रा.विलास जाधव, प्रा.गणेश भिसे व यांच्यासह विभागीय सचिव प्रा.पी.पी. जाधव, प्रा.ए.के.वाणी, प्रा.के.के.चव्हाण, प्रा.एस.जी. जगदाळे, प्रा.एस.बी.नलावडे यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष मा.प्रा.डॉ.वाय.ए.कवडे , महासंचालक प्रा.मुनिषजी शर्मा, एम आय टी प्राचार्य किशोर पाटील यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.



# शिवाजी बँकेच्या चेअरमनपदी रवींद्र काळे, तर व्हा. चेअरमनपदी भाऊसाहेब औटे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शिवाजी नागरी सहकारी बँकेची चेअरमन व व्हा.चेअरमन पदाची निवडणूक आज निवडणूक निर्णय अधिकारी श्री.अनिल पुरी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली बिनविरोध पार पडली. यावेळी चेअरमन पदी सलग तिसऱ्यांदा श्री. रवींद्र शिवाजीराव काळे यांची तर व्हा.चेअरमन पदी श्री. भाऊसाहेब बापूसाहेब औटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी नवनियुक्त संचालक यांचा सत्कार करण्यात आला. हरिपंडित रंगनाथबुवा गोसावी,रामचंद्र शिवाजीराव काळे, पाशा अब्दुल रहेमान धांडे, शंकरराव ज्ञानदेव राऊत,अशोक श्रीकिसन जाधव ,अरुण केशवराव नरवडे,शामकुमार मदनलाल लोहिया,राजेंद्र उत्तमराव टेकाळे, सौ.तनुजा सोमनाथ जाधव,सौ.सुनीता सुनील जाधव,कारभारी देवराव लोहकरे, दशरथ आसाराम सोनवणे, पृथ्वीराज लहरसिंग चौहान यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ई आय पठाण, जी.व्ही .म्हस्के, नरसिग् लोहिया ,संतोष राऊत ,बाळू राऊत,कारभारी सोनवणे, अप्पासाहेब मिसाळ, बाप्पासाहेब सोनवणे,किशोर वैद्य,याकूब पठाण, विठ्ठल तळपे, आदी उपस्थित होते.

# व्हीपीके उद्योग समूहाच्या वतीने चार लाख मेट्रिक टन ऊस गाळप

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**उमरी :** व्हीपीके गुळपावडर कारखाना प्रयागनगर सिंधी,वाघलवाडा येथील एमव्हीके साखर कारखाना व डॉ.शंकरराव चव्हाण गुळपावडर आधी तिन कारखाना अंतर्गत गळीत हंगाम २०२३ ते २०२४ जानेवारी अखेर पर्यत चार लाख मेट्रिक टन ऊस गाळप यशस्वी रित्या केले असल्याची माहिती समुहाचे संस्थापक अध्यक्ष मारोतराव पाटील कवळे



गुरूजी यांनी दिले. त्यामुळे सर्व संचालक, सभासद, खाते प्रमुख, आधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूक ठेकेदार व आमचे सर्व हितचिंतकांचे मनापासून आभार व सर्वांना शुभेच्छा असे कवळे गुरूजी व्यक्त केले. व्हि



पी के उद्योग समूहातील तिन्ही कारखान्याच्या वतीने माहे डिसेंबरखेरपर्यन्त २५००/- रूपये प्रती टन एकरकमी दर देण्यात आला असून जानेवारी ०१ ते १५ तारखे पर्यंत एकरकमी २५५०/- रू आणि १५ ते ३१ जानेवारी पर्यंत २६००/- रू प्रती टन (प्रती पंधरवाडा पन्नास रुपये वाढ प्रमाणे)एकरकमी दर देण्याचे ठरवले आहे त्यासोबतच फेब्रुवारी आखेर पर्यंत गाळपास आलेल्या ऊसास २७००/- रू प्रती टन तर मार्च अखेर पर्यंत ऊस गाळपासाठी आल्यास एकरकमी २८००/- रू प्रती टन भाव देण्याचे उद्योग समूहाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे त्यामुळे कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवांनी ऊस तोडणीसाठी घाई न करता आपला ऊस राखून ठेऊन उच्चांकी भाव मिळवून आपली आर्थिक उन्नती साधावी.ऊस उत्पादक शेतक-यांना ऊस पिकाला दर्जेदार भाव उद्योग समूहाच्या वतीने मिळत असल्याने शेतक-यांनी मोठ्याप्रमाणात ऊस लागवड करावे. जेणेकरुन ज्या शेतक-याला नवीन ऊस लागवड करावयाचे झाले असल्यास कारखान्याच्या ऊस विकास योजने अंतर्गत ऊस रोप व बेणे घेऊन लागवड करावी.असे कवळे गुरूजी यांनी सांगितले.



# चांदई टेपली जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदई टेपली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून वार्षिक स्नेहसंमेलन या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमातुन विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेषभूषा परिधान करून लोकगीत, लावणी, भारूड, गोंधळ, भक्ती गीते, चुटकुले, उखाने, लघुनाटिका, हिंदी व मराठी चित्रपट गीतावर नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच राजीव टेपले, उपसरपंच भिमराव दादा घोरपडे, केंद्रप्रमुख आण्णा इंगळे, शालेय समिती अध्यक्ष संदीप घोरपडे, उपाध्यक्ष भगवान धसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकात आण्णा इंगळे यांनी विद्यार्थ्यांनी अभिनय क्षेत्रात भरारी घ्यावी, प्रगती करून नावलौकिक मिळवावा असे नमुद केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व पालकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

कार्यक्रमातून सामाजिक, प्रबोधनात्मक विषयातून उत्कृष्ट जनजागृती करण्याचे काम शाळेच्या सर्व बालकलाकारांनी केले.त्याबद्दल उपस्थितांनी विद्यार्थी व शाळेचे कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याधापक आण्णा इंगळे,सचिन अक्कर,मनिषा सोणवने, सतिश शिरसाठ, कांता पुंगळे,प्रशांत पिसे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष गणेश टेपले, दादासाहेब घोरपडे,राम राऊत, विकास मोरे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी,युवक, बचत गटाच्या महीला,ग्रामस्थ ,पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सुत्र संचालन सचिन अक्कर ,वेशभुषा मनिषा सोणवने,स्वाती घोरपडे यांनी तर नियोजन सतीश शिरसाठ यांनी केले.

# मुस्लिम समाजाला सरसकट ओबीसीमधून आरक्षण द्यावे : भारतीय दलित पँथर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** महाराष्ट्रातील मुस्लिम समाज सुद्धा मागासलेला आहे, मुस्लिम समाज हालाखीचे जीवन जगत आहेत. शैक्षणिक, नोकरी व राजकीय आरक्षण नसल्याने मुस्लिम समाज नेतृत्वहीन मागासलेला आहे. हा समाज खुप कठीण परिस्थितीतून मार्ग काढत छोटे छोटे व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत आहे. म्हणून या करिता मुस्लिम समाजाला सुद्धा आरक्षण मिळावे यासाठी भारतीय दलित पँथर च्या वतीने काल दिनांक 30 जानेवारी रोजी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, मुस्लिम समाजाच्या कुणबी नोंदी व कुणबी प्रमाणपत्र सापडलेले असून त्यांना सुद्धा ओबीसी मधून सरसकट आरक्षण देण्यात यावे आज पर्यंत मुस्लिम समाज आरक्षणापासून वंचित राहिलेला आहे त्यांना सुद्धा आरक्षणाची फार गरज आहे मुस्लिम समाजाला सुद्धा सरसकट आरक्षण देण्यात यावे. शासन स्तरावर याचा विचार करावा अन्यथा फुलंब्री तहसील कार्यालयावर भारतीय दलित पँथर च्या वतीने तीव्र प्रकारचे आंदोलन छेडण्यात येईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी. या प्रसंगी भारतीय दलित पँथर चे तालुका अध्यक्ष रंजीत वाहूळ, तालुका उपाध्यक्ष सय्यद जहिरूद्दीन चिश्ती, सचिव भगवान गंगावणे, महिला तालुका अध्यक्ष लक्ष्मीबाई पाचवणे, शहराध्यक्ष मंगेश गुंजाळ, तालुका उपाध्यक्ष किशोर गंगावणे, काकासाहेब शिरसाट, बाळासाहेब साळवे, बबन गायकवाड, काकासाहेब पाचवणे संदीप साळवे यांच्या आदींची उपस्थिती होती.





# फुलंब्री येथे पो. नि. संजय सहाने यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पोलीस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक संजय सहाने व नव्यानेच रुजू झालेले एपीआय संभाजी वडते यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी, फुलंब्री भाजपा तालुका उपाध्यक्ष राम बनसोड, भगवान भाऊ निराशे, कृष्णा पाथ्रे, नवाब पटेल, गणेश तारू व आदी मान्यवर उपस्थित होते.

# जेठे वस्तीवर हळदी-कुंकवाचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ममुराबाद येथे सन्माननीय मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील आमदार सतीश चव्हाण यांच्या कडून महिलांना हळदी कुंकू निमित्त ममुराबाद येथे मिठाई वाटप करण्यात आली. असता ईथे उपस्थित जावेद बशीर पटेल गुप्र ग्रामपंचायत ममुराबाद, जानेफळ,शेळगाव चे तंटामुक्ती अध्यक्ष, तथा खुलताबाद तालुकाध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शिवाजी जेठे, साखराबाई सूर्यभान जेठे. दारका बाई लक्ष्मण जेठे.रहीबाई कडूबा जेठे. मंडाबाई किसन जेठे.शोभाबाई कारभारी जेठे.गयाबाई जनार्दन जेठे.आशाबाई सुधाकर जेठे.मंगलबाई शिवाजी जेठे.पुष्पाबाई प्रकाश जेठे.रंजनाबाई भानुदास जेठे.रेखाबाई सुखदेव जेठे. पुष्पाबाई एकनाथ जेठे.कमल पंडित जेठे.वैशाली नामदेव जेठे. मालनबाई भागिनाथ जेठे.विमल रत्नाकर जेठे.उषा सुभाष वेताळ. इतर महिलावर्ग मोठ्या संख्येने हजर होत्या.



# बालवाडी शिक्षिका अनुराधा ठोंबरे यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** 31 जानेवारी रोजी महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेअंतर्गत असलेल्या फुलेनगर येथील बालवाडी मध्ये कार्यरत असलेल्या बालवाडी शिक्षिका माननीय श्रीमती अनुराधा ठोंबरे मॅडम आज सेवानिवृत्त झाल्या.

सदरील कार्यक्रम शाळेचे माननीय मुख्याध्यापक श्री शेख अहमद पटेल सर यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आला होता.

सदरील कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी मा. श्री. भारत तीनगोटे सर, माजी मुख्याध्यापिका मा. श्रीमती हेमलता भुयार मॅडम, श्री. किशोर दांडगे सर हे मान्यवर उपस्थित होते.

सर्व मान्यवर, शिक्षक, शिक्षिका यांनी मा. श्रीमती अनुराधा ठोंबरे मॅडम यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.श्री. मनोज अग्रवाल यांनी सूत्रसंचालन व मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मा.श्रीमती सुनंदा आरदवाड ,मा.श्रीमती अनिता शेटे ,मा.सौ.संगीता आंबेकर ,मा. श्रीमती अंजली कुलकर्णी , मा.श्रीमती स्वाती घोडतुरे ,मा.श्रीमती मंगला महाजन, मा.श्रीमती सुनिता पाटील,श्रीमती दीपाली औटे,श्रीमती शिल्पा बहुरे, श्री. वेंकट जाधव,श्रीमती मंजुश्री राठोड, श्रीमती वैशाली देशमुख, श्रीमती शुभांगी चव्हाण,श्री. दीपक पडोळ,श्री सुमित दाभाडे,मा.श्रीमती नादेरा सय्यद,मा.श्रीमती फिरदोस नदाफ, श्रीमती सबा सिद्दिकी, श्रीमती वंदना सुरडकर,श्रीमती पुष्पा दाभाडे या शिक्षकांनी व श्री विजय गायकवाड, श्री रमेश देवडे, श्रीमती रेखा नाटेकर, या सेवकांनी सक्रियपणे योगदान दिले.

# पंचायत समिती ते तहसील कार्यालय भव्य मोर्चा काढून थाळीनाद आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**शेवगाव :** आशा व गट प्रवर्तकाच्या संपा दरम्यान मान्य केलेल्या मागण्यांचा शासन निर्णय न काढल्यामुळे दि. १२ जानेवारी २४ रोजी राज्यव्यापी संप सुरू केला आहे. त्यामुळे पंचायत समीती शेवगाव ते तहसिल कार्यालय भव्य मोर्चा काढुन थाळीनाद आंदोलन करण्यात आले. अशा गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने दिनांक १८ ऑगस्ट २०२३ रोजी ते १ जानेवारी २४ या कालावधीत त्यांच्या न्याय व रास्त मागण्यासाठी संप पुकारण्यात आला होता यावेळी महाराष्ट्र राज्य आरोग्य मंत्री यांनी मुंबई येथील बैठकीत निर्णय घेऊन खालील घोषणा केल्या होत्या अशा व गटप्रवर्तकांना दिवाळीपूर्वी २००० दिवाळी भेट देण्यात येणार अशा स्वयंसेविका यांना सात हजार रुपये वाढ व गटप्रवर्तक यांना दहा हजार रुपये वाढ देण्यात येणार आहे आशा व गटप्रवर्तक कर्मचारी यांना ऑनलाईन कामाची सक्ती केली जाणार नाही अशा मागण्या मान्य करूनही या संदर्भात शासन निर्णय जाहीर केला नाही याचा निषेध म्हणून १८ डिसेंबर २३ रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनावर भव्य मोर्चा काढण्यात आला तरी पण राज्य सरकारने शासन निर्णय दिला नसल्याने राज्यातील सर्व आशा व गटप्रवर्तक कर्मचारी दिनांक १२जानेवारी पासून बेमुदत संपावर आहेत तसेच या आंदोलनाचा भाग म्हणून शेवगाव पंचायत समिती ते तहसिल कार्यालय भव्य मोर्चा काढुन येथे आशा व गटप्रवर्तक कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने जमुन थाळी नाद आंदोलन केले. यावेळी अशा यावेळी आशा व गटप्रवर्तक संघटनेच्या राज्याचे नेते कॉम्रेड संजय नांगरे कॉ.गोरख काकडे ,बाबुलाल सय्यद,अंजली भुजबळ,सुनेत्रा महाजन, फरहान पठाण,वैशाली भूतकर सुवर्णा देशमुख गीता खोसे वाघुले वैशाली संगीता रासकर,अनिता भुजबळ ,सुवर्णा साळुंखे, मंगल कोल्हे, लता ठोंबळ, सुनीता सोनटक्के, जगदने संगीता, शितल थोरवे, तारा अव्हाड, कविता दुधाळ, अलका कोरडे, सुनिता देवढे, अशा व गटप्रवर्तक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावतीहून विमानसेवेसाठी आणखी प्रतीक्षाच!

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** बेलोरा येथील विमानतळाच्या टर्मिनल बिल्डिंगचे काम येत्या एप्रिलपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असली, तरी प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होण्यासाठी अजून प्रतीक्षा करावी लागणार आहे. अमरावती विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम विविध कारणांमुळे रखडत गेले. बेलोरा येथील विमानतळावर १३०० मीटरची धावपट्टी होती. एटीआर-७२ सारख्या विमानांना उतरणे सोयीचे व्हावे, यासाठी ही धावपट्टी १८५० मीटरपर्यंत वाढवण्याचे नियोजन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने (एमएडीसी) केले होते. हे काम आता पूर्णत्वास जात आहे. दुसरीकडे, टर्मिनल बिल्डिंगची उभारणी देखील अंतिम टप्प्यात आहे. या मुख्य इमारतीचे काम एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचा एमएडीसीचा प्रयत्न आहे.

विमानतळाची धावपट्टी ही १९९२ मध्ये उभारण्यात आली होती. सध्या या धावपट्टीचा वापर केवळ खासगी विमानांसाठी होतो. राज्य सरकारने २००९ मध्ये एमएडीसीला बेलोरा विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या कामासाठी विशेष उद्देश कंपनी म्हणून नियुक्त केले होते आणि २८० कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी देखील देण्यात आली होती. पण, हे काम रखडले. २०१७ मध्ये विमानतळाचा ताबा पुन्हा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्याकडे देण्यात आला. मध्यंतरीच्या काळात धावपट्टीचा विस्तृत आरखडा तयार करण्यात आला. शेवटच्या टप्प्यात एटीआर-७२ प्रकारातील विमानाचे उड्डाण करण्यासाठी रात्रकालीन विमान उड्डाणाच्या सुविधेसह धावपट्टीची लांबी १३७२ मीटरवरून १८५० मीटपर्यंत वाढवणे व इतर कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला. १३ जुलै २०१९ रोजी विस्तारीकरणाचे भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवातदेखील करण्यात आली होती. परंतु हे काम शेवटच्या टप्प्यात पुन्हा रखडले. विमानतळासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी शासन स्तरावरील अनास्था बघता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणीदरम्यान एप्रिल २०२४ पर्यंत ही कामे पूर्ण होतील, असे प्रतिज्ञापत्र राज्य सरकारने उच्च न्यायालयात सादर केले होते. आता एप्रिलपर्यंत कामे पूर्ण झाली तरी, लोकसभा निवडणुकीच्या धावपळीत उद्घाटन लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अमरावती विमानतळावरून मार्च २०२४ पासून इंडिगो कंपनीची ७२ आसनी एटीआर मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवा सुरू होणार असल्याचा दावा खासदार नवनीत राणा यांच्या जनसंपर्क कार्यालयातर्फे करण्यात आला आहे. दरम्यान, मंगळवारी खासदार राणा यांनी विमानतळाची पाहणी केली.

# फायनान्स कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** फायनान्स कंपनीच्या मनमानी कारभाराच्या विरोधात येथील काही कर्जदारांनी एकत्र येऊन शेवगावच्या तहसीलदारांकडे दाद मागितली आहे. सदरील तक्रारदार तहसीलदार शेवगाव यांचेकडे तक्रार अर्ज देऊन आपल्याला न्याय मिळावा अशी मागणी निवेदनाद्वारे केली. घेतलेली रक्कम त्याच्या दुप्पट पैसे भरूनही त्यापेक्षाही अधिक रक्कम खाजगी कंपनी कर्जदाराच्या माथी मारत आहे. या खाजगी कंपनीने नेमलेले वसुली अधिकारी जुलमी पद्धतीने वसुलीचा तगादा लावत आहे.तुमचे घर खाली करा...तुमच्या घराचा निलाव झाला आहे.. आम्ही घराची जप्ती करायसाठी आलो आहे. मात्र हे फायनान्स कंपनीचे अधिकारी कोणतीही सूचना न देता मनमानी पद्धतीने आमच्यावर आर्थिक बोजा दाखवीत आहे,कर्जाची रक्कम भरून व्याजही भरले मात्र कर्जाच्या अधिक रक्कम आकारण्याची मनमानी भाषा या कंपनीची असून जोर जबरदस्तीने घर जप्ती करण्याचा अमानुष प्रकार त्यांच्या कडून सुरू आहे. आम्ही जप्तीच्या कारवाई बाबत कायदेशीर बाबी पुर्ण केल्याची. असी पासून करीत असल्याची खोटी माहिती देऊन कर्जदारांची फसवणूक होत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे या मनमानी कारवांमुळे काहींनी आत्महत्या केल्या असून आम्हालाही त्याच मार्गाने जाण्याची वेळ आली आहे प्रशासनाने लक्ष घालून आम्हाला घालून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली प्रवीण बरबडे, अरुण वैद्य, जालिंदर चेडे, धामके, अक्षय खोमणे ,डॉ देविदास धावणे, दिलीप राजळे,सादिक शेख,नितीन शिंदे, गमे,असिफ पठाण, प्रवीण शिरोडकर,सुहास वेताळ यांच्या सह उपस्थित होते.





# जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचा 'मायेची चादर' अभिनव उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ व शिक्षण महर्षी स्वर्गीय के के जाधव सेवाभावी प्रतिष्ठान कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने कष्टकरी ऊसतोड कामगार यांना सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून मायेची ऊब या उपक्रमातून ( वर्ष दुसरे ) मायेची चादरीचे वाटप जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णराव जाधव यांच्या हस्ते वितरण करण्यात आले .जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ व शिक्षण महर्षी स्वर्गीय के के जाधव सेवाभावी प्रतिष्ठान नेहमीच सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून मदतीचा हात या उपक्रमातून गरजू व्यक्तींना नेहमीच मदत करत असते. कन्नड साखर कारखाना परिसरातील कष्टकरी ऊसतोड कामगारांना तीव्र थंडीपासून त्यांचे संरक्षण व्हावे व त्यांचा बचाव व्हावा यासाठी 150 कामगारांना मायेची चादरीचे वाटप जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णराव जाधव यांच्या हस्ते वितरण करण्यात आले या प्रसंगी माणसाने जीवनात नेहमी इतरांच्या कामी आले पाहिजे गरजवंताला मदत केल्यास खरे समाधान मिळते. संकट काळात धाऊन जाणे खरा मानवता धर्म असल्याचे मत जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांनी मत व्यक्त केले. याप्रसंगी आबासाहेब चव्हाण, बाळासाहेब निकम, हेमराज खोब्रागडे, रावसाहेब निकम ,जगन्नाथ जाधव, सचिन भामरे, संतोष जाधव, सुभाष जाधव, यांची उपस्थिती होती.

# गर्भलिंग निदान होत असलेल्या सोनोग्राफी केंद्रांवर कडक कारवाई करा : जिल्हाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात स्त्रीभ्रूणहत्या टाळून लिंग गुणोत्तराच्या प्रमाणातील दरी कमी करण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. याकरीता बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या केंद्राची गोपनीय माहिती घेऊन गर्भलिंग निदान चाचणी होत असलेल्या सोनोग्राफी केंद्रावर कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील वीस कलमी सभागृहात दक्षता पथकाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अपर पोलीस अधीक्षक रीना जनबंधू, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संग्राम शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे, अधिष्ठाता डॉ. कांबळे, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुरेश पेंदाम, मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद किन्नाके, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर, सहाय्यक सल्लागार कैलाश उईके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, जिल्ह्यातील सोनोग्राफी केंद्राची माहिती अदयावत ठेवावी. जिल्ह्यात एक व दोन मुलीवर किती गर्भपात झाले? याची काटेकोरपणे तपासणी करावी व याबाबत सखोल माहिती घ्यावी. संबंधित यंत्रणेने जिल्ह्यातील तसेच मनपा क्षेत्रातील प्रत्येक सोनोग्राफी केंद्राला भेट देऊन तपासणी करावी. यासाठी पोलीस प्रशासनाची मदत घ्यावी, पोलीस विभागाने बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या केंद्राची गोपनीय माहिती घ्यावी. सदर केंद्र दोषी आढळून आल्यास पीसीपीएनडीटी कायद्यान्वये कार्यवाही करावी. जिल्ह्यातील स्त्री-पुरुषांचे लिंग गुणोत्तर संतुलित राहण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. यासाठी महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृतपणे लिंगनिदान होत असल्यास कठोर कारवाई करावी. जिल्ह्यात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व्यापक जनजागृती करावी. सोनोग्राफी केंद्र तसेच गर्भपात केंद्रावर माहिती देणारे फलक दर्शनी भागात लावावेत, अशा सूचना देखील जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी बैठकीत संबंधित यंत्रणांना दिल्या.



# पक्ष्यांना देश विदेशात स्थलांतरासाठी खगोलशास्त्रीय ज्ञान उपयोगी

## डॉ. श्रीनिवास औंधकर : पैठण येथे १०व्या पक्षी महोत्सवात प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान पैठण आयोजित एन्व्हायरमेंट रिसर्च अँड एज्युकेशनल अकॅडमीचा दहावा पक्षी महोत्सव पैठण येथील माहेश्वरी भक्तनिवासाच्या सभागृहामध्ये उत्साहात संपन्न झाला. या संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ एमजीएम विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. श्रीनिवास औंधकर यांच्या हस्ते संपन्न झाले. खगोलशास्त्राचा अभ्यास हा पर्यावरणाच्या ज्ञानासाठी व पक्षी हे अन्न साखळीतील महत्वाचा घटक असुन त्याचे संवर्धन न झाल्यास पृथी वरील मानवी वास्तव्य धोक्यात येऊ शकते त्यासाठी  शेती, पाणी, पर्यावरण आणि मनुष्य जीवन समजून घेण्यासाठी खगोलशास्त्र अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. श्रीनिवास औंधकर यांनी केले. खगोलशास्त्रामुळे पर्यावरणात होत असलेले बदल लक्षात येतात. पक्षी कमी का होतात त्याची कारणे शोधता येतात आणि उपायही सापडतील असा विश्वास श्रीनिवास यांनी याप्रसंगी व्यक्त केला. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मानद वन्यजीव रक्षक छत्रपती संभाजीनगर विभागाचे डॉ. किशोर पाठक हे होते. पक्षी, त्यांचे विविध खाद्य, विविध प्रजाती आणि त्यावरून पर्यावरणात होत असणारा अमुलाग्र बदल यावर डॉ. पाठक यांनी भाष्य केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात जायकवाडी प्रकल्पाचे महत्त्व समजावून सांगताना पक्षी जगले पाहिजेत, टिकले पाहिजेत आणि यासाठी माणूस म्हणून आपण पक्षाला आपलं मित्र मानल पाहिजे असे ते म्हणाले.



पैठणच्या जायकवाडी धरणावर होऊ घातलेला सोलार प्रकल्प रद्द झाला पाहिजे अशी आग्रही भूमिका आपल्या भाषणात डॉ. पाठक यांनी मांडली. त्याला स्वागताध्यक्ष प्रा.संतोष तांबे यांनी अनुमोदन दिले. सकाळी दहा वाजता पैठणचे प्रसिद्ध छायाचित्रकार तथा पक्षीमित्र दिलीप भगत यांच्या हस्ते डॉ. सलीम अली चित्रदालनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मानद वन्यजीव रक्षक श्री दिलीप यार्दी यांची उपस्थिती होती. पक्षाच्या विविध सवयी, पक्षाची प्रजनन पद्धत, विविध पक्षांचे अधिवास, पक्षांचे वैविध्यपूर्ण फोटो याची माहिती आपल्या चलचित्र फितीद्वारे श्री दिलीप यार्दी यांनी उपस्थितांना दाखवून पक्षी अभयारण्य निर्मितीची रंजक कथा सांगितली. मनुष्य आणि पक्षी सहजीवन या विषयावरील परिसंवाद आणि त्यानंतरची प्रश्नोत्तरे विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरली. परिसंवादात नाशिकहून आलेले प्रसिद्ध पक्षी मित्र आणि लेखक डॉ.अनिल माळी आणि परभणीहून आलेले पक्षी येथे अंगणी या कादंबरीचे लेखक श्री माणिक पुरी यांनी सहभाग नोंदवला. अनेक ऐतिहासिक दाखले देत माणिक पुरी आणि अनिल माळी यांनी पक्षांच्या जीवनातील अनेक पौराणिक आणि संत साहित्यातील रंजक कथा सांगितल्या.  समारोपाच्या सत्रात डॉ. छाया महाजन यांनी साहित्यातून निसर्ग, प्राणी, पक्षी यांचे जीवन आपण वाचत असतो; परंतु पैठणकर भाग्यवान आहेत. त्यांना जायकवाडी अभयारण्याच्या रूपाने प्रत्यक्ष पक्षी आणि जैवविविधता पाहता आणि अनुभवता येते. विद्यार्थ्यांनी बालवयातच निसर्गाशी आपले नाते जोडले पाहिजे, असा सल्लाही त्यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी दिला. प्रास्ताविक स्वागताध्यक्ष संतोष तांबे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बजरंग काळे, प्रा.संतोष गव्हाणे, प्राचार्य संदीप काळे, सारिका धोकटे यांनी केले. तर आभार कार्याध्यक्ष डॉ.संजय तांबे पाटील, सुनील खोलासे, आर.बी. रामावत यांनी मानले.

कार्यक्रमाला जयंत पाटील, सचिन सेवनकर, सुभाष शिंदे, विष्णू ससाणे, महेंद्र नरके, भैय्या जमादार, रुचिर भगत, अभिषेक चन्ने, अभिजीत निंबाळकर, ऋषिकेश नवथर, पूजा देशमुख, मंगल कोळगे, तब्सुम पठाण, विजय कटारे, ज्ञानेश्वर नवले, पंढरीनाथ फुळझळके, गणपत मिटकर यांची विशेष उपस्थिती होती.  याप्रसंगी पत्रकार रमेश शेळके, बद्रीनाथ खंडागळे, दादा गलांडे,सुरेश वायभट, दादासाहेब घोडके यांचा सत्कार करण्यात आला.

# स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठानतर्फे सावरकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठानतर्फे आयोजित सावरकर स्मृति व्याख्यानमाला उद्या, गुरुवार, १ फेब्रुवारीपासून आयोजित करण्यात आली आहे. गुरुवारी सायंकाळी सात वाजता व्याख्यानमालेचे उद्घाटन सुप्रसिद्ध अधिवक्ता आणि शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे यांच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड एस. के  जैन यांच्या हस्ते होणार आहे. व्याख्यानमालेचे हे तेरावे वर्ष आहे. उदघाटन समारभं आणि ही सर्व व्याख्याने आनंदक्षण शाळा, पोलिस स्टेशनसमोर, सनसिटी रस्ता, आनंदनगर सिंहगड रस्ता पुणे येथे सायंकाळी ७ वाजता होतील.  चार दिवस चालणाऱ्या या व्याख्यानमालेत एक फेब्रुवारीला जागतिक नेमबाजी स्पर्धा विजेत्या तेजस्विनी सावंत यांची 'क्रीडाविश्वातील महिलांचे योगदान' या विषयावर मुलाखत होईल. २ फेब्रुवारीला अभिजित जोग यांचे 'जगाला पोखरणारी वैचारिक वाळवी' या विषयावर, ३ फेब्रुवारीला गीता उपासनी यांचे 'गुणसागर सावरकर' या विषयावर तर यंदाच्या व्याख्यानमालेचा समारोप ४ फेब्रुवारीला प्रशांत पोळ यांचया 'बदलता भारत' या विषयावरील व्याख्यानाने होणार आहे, असे स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान व्याख्यानमाला संयोजन समितीने कळवले आहे. कोरोना काळातील दोन वर्षे वगळता व्याख्यानमाला ही सातत्याने अधिकाधिक चांगल्या पद्धतीने आयोजित केली जाते आहे. यंदा देखील श्रोत्यांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा अशी माहिती रवींद्र शिंगणापूरकर व व्याख्यानमाला समिती प्रमुख सारिका वाघ  यांनी दिली.



# जि. प. प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त शिक्षक डी पी पेडगावकर सर, सेवानिवृत्त शिक्षक वामनराव मोरे सर, सेवानिवृत्त शिक्षक हरिश्चंद्र तिवारी सर, सेवानिवृत्त चित्रकला शिक्षिका भायकरबाई व माजी  विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम ज्ञानाची देवता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता राजमाता मा  जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून मशाल पेटवण्यात आली. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या मनोगतानंतर वामनरावजी मोरे सर, दिनकरराव पेडगावकर सर, हरिश्चंद्र तिवारी सर व भायकर बाई यांनी माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानिमित्ताने जून्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये वामनरावजी मोरे सर यांनी जिल्हा परिषद शाळेला  एक लाख रुपयाचा चेक फिक्स डिपॉझिट म्हणून दिला. या फिक्स डिपॉझिटच्या व्याजावर दहावीच्या  मुलांमध्ये पहिला, दुसरा तर मुलीमध्ये  पहिला ,दुसरा क्रमांक जो पटकावेल त्याला ही शिष्यवृत्ती वामनरावजी मोरे व सुमनबाई मोरे यांच्या नावाने देण्यात येईल.
हा चेक गावातील  उपसरपंच शेख रफिक भाई यांच्याकडे देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष तायडे यांनी केले, प्रास्ताविक प्रकाश भेरजे तर आभार प्रदर्शन अरुण चौधरी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीकांत बेंडसुरे, आशाताई गायकवाड, शेख रफिक भाई ,रमेश गोरे, सूर्यकांत मोरे व इतर मित्रांनी पुढाकार घेतला होता.





# अप्पारापेठ नियतन क्षेत्रात अवैध सागवान लाकूड पकडले; सागवान तस्कर मात्र फरार

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** अप्पारापेठ वनपरिक्षेत्र प्रादेशिक कार्यालय अंतर्गत अप्पारापेठ वनपरिमंडळामध्ये मौजे फुलेनगर नियतन क्षेत्रात अवैध सागवान लाकडाची तस्करी केली जात होती. याबाबतची गुप्त माहिती मिळताच केशव वाबळे सर उपवनसंरक्षक नांदेड, गणेश गिरी सर सहा.वनसंरक्षक रोहयो व वन्यजीव विभाग किनवट उमेश ढगे  वनपरिक्षेत्रअधिकारी प्रा. आप्पारापेठ यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ जानेवारी रोजी रात्री गुप्त माहितीवरुन तेलंगणा-महाराष्ट्र राज्य सिमालगत नियतक्षेत्र मौजे फुलेनगर कक्ष क्रमांक २८६ मध्ये आम्ही वनकर्मचारी दबा धरुन बसलो असता,वनतस्कर यांना आमची चाहुल लागताच आम्हाला पाहुण सागी गोल नग ०९ टाकुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले.त्यानंतर जंगल फिरती करुन पाहणी केली असता अवैध वृक्षतोडीचे सागी थुट ०७ दिसुन आले आहे. सदर सागी गोल नग ०९ घनमीटर ०. ४६४जप्त करून योग्य ती कार्यवाही करण्यात आली. या कार्यवाहीत श्रीराम सज्जन वनपरिमंडळ अधिकारी आप्पारापेठ,वनरक्षक श्रीमती भाग्यश्री धोतरे यांनी कार्यवाही केली आहे.मदतीसाठी गांवकरी पोशट्टी गौड,तुकाराम खोकले,प्रवीण शिरपूरे, भंडारे,श्रीकांत यंन्नम,लिंगन्ना सारंगपुर आदी उपस्थित होते.या घटनेवरून लाकुड तस्कर सक्रीय झाले आहेत. वनपरिक्षेत्रात रात्रंदिवस गस्त घालणे आता अतिशय गरजेचे झालेले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# ७ फेब्रुवारीला चंद्रपुरात महामोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती-जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठी जी अधिसूचना काढली आहे, ती रद्द करावी आणि ओबीसी (विजा, भज, व विमाप्र), अनुसूचित जाती, जमाती व इतर समाजांची जातनिहाय जनगणना करावी, या मागण्यांसाठी ७ फेब्रुवारीला येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलली आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब दि. २६ जानेवारी २०२४ नुसार मसुदा जाहीर केला आहे. यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण असून मूळ ओबीसींवर अन्याय करणारा हा निर्णय आहे. घटनात्मक नसतानाही शिंदे समितीच्या शिफारसीवरून कुणबी प्रमाणपत्र देणे हे घटनाबाह्य आहे. याविरोधात ७ फेब्रुवारीला चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चाचे आयोजन ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा, भज व विमाप्र समाजातर्फे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने केवळ आंदोलनाचा धसका घेऊन कुठलाही विचार न करता मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. हा ओबीसींवर अन्याय आहे. आम्ही ओबीसींवरचा अन्याय सहन करणार नाही. सरकारने हा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे.

# शिरपूर तालुका पोलिसांनी केला लाखोंचा गुटखा जप्त; कंटेनरसहित मुद्देमाल हस्तगत

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** पोलीस निरिक्षक श्रीराम पवार यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली को, सेंधवाकडुन शिरपुरकडे वाहनात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेलो सुगंधित तंबाखू भरुन महाराष्ट्र राज्यात पुरवठा करण्यासाठी वाहतुक करीत आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्यावरुन पोनि/श्रीराम पवार यांनी लागलीच संदिप ठाकरे, चालक संतोष पाटील, योगेश मोरे, स्वप्नील बांगर, संजय भोई अशांना सदर वाहनाची खात्री करुन कारवाई करणे बाबत आदेशित करुन सदर वाहन हे हाडाखेड सिमा तपासणी नाका येथे दि. 30 रोजी सकाळी 06.30 वाजेच्या सुमारास पकडून वाहनावरील चालक व क्लिनर यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव चालक 1) सद्दाम मुनीजर वय 32 वर्षे, व्यवसाय चालक, क्लीनर 2) मो. बिलाल फजरखान, वय- 27 वर्षे, दोन्ही रा. फिरोजपुर मेयो ता. पुनहाना जि. नुहु राज्य हरियाणा असे सांगुन त्यास वाहनात काय आहे बाबत विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिले. त्यामुळे सदर वाहनात तंबाखू सदृश पदार्थ असल्याचा संशय असल्याने सदर वाहन पोलीस ठाण्यात आणून दोन पंचांसमक्ष पंचनामा करुन त्यात खालील प्रमाणे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेली सुगंधित तंबाखू मिळुन आली. 1) 4,70.400/- रुपये किंमतीची अराधना छाप नावाची सुगंधित तंबाखू. 2) 3,96,800/- रुपये किंमतीची प्रिमीयम रत्ना छाप नावाची सुगंधित तंबाखू. 3) 15,00,000/- किंमतीचा एक 10 चाकी अशोक लेलैंड कंपनीचा ट्रक. एकुण- 23,67,200/- कारवाही करण्यात आली आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री किशोर काळे. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरपुर श्री सचिन हिरे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक श्रीराम पवार,रफिक मुल्ला, संदिप ठाकरे, चालक संतोष पाटील, योगेश मोरे, स्वप्नील बांगर, संजय भोई, कृष्णा पावरा यांनी केलेली आहे.

# भोकरदन विधानसभा समन्वयकपदी बाकलीवाल

## घनसावंगी समन्वयकपदी नरेंद्र जोगड यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज




**घनसावंगी :** पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, जे.पी. नड्डाजी, देवेंद्रजी फडणवीस ,केंद्रीय रेल्वे मंत्री रावसाहेबजी दानवे ,मा.आ.संतोषजी दानवे यांच्या मार्गदर्शनात प्रदेश अध्यक्ष मा.आ. चन्द्रशेखरजी बावनकुळे व जैन प्रकोष्ट प्रदेश अध्यक्ष मा संदीपजी भंडारी यांच्या निर्देशानुसार महाविजय 2024 अंतर्गत भाजपा जैन प्रकोष्ठ, भोकरदन विधानसभा समन्वयक पदी मयुर विजयकुमार बाकलीवाल यांची निवड करण्यात आली ही निवड जैन प्रकोष्ठ च्या महाराष्ट्र प्रदेश तर्फे करण्यात आली आहे मयुर बाकलीवाल हे भारतीय जैन संघटनेचे तालुका अध्यक्ष पदावर,तर नरेंद्र जोगड है घनसावंगी तालुका सचिव पदावरअसताना त्यांनी नदी खोलीकरण,गाळ मुक्त अभियान,कोरोना काळात डॉक्टर आपल्या दारी भोकरदन तालुक्यातुन तब्बल २५००० रुग्ण तापासले, आनाथ विद्यार्थ्यांची संघटने मार्फ़त १२ वी पर्यन्त मोफत शिक्षण, ऑक्सीजन आपल्या दारी, रक्तदान शिबीर असे बरेच समाजीक कार्य त्यांनी यावेळी केले. त्याचीच पावती म्हणून त्यांना जिल्ह्याची जबाबदारी आ र जे एम ओ च्या मध्यमातुन मिळाली आ र जे एम ओ च्या माध्यमातून अल्पसंख्यक ची जनजागृती त्यांनी केली. हे करत असताना भाजपा जैन प्रकोष्ठ चे प्रदेश अध्यक्ष संदीप भंडारी यांनी श्री बाकलीवाल व श्री जोगड यांच्या कामाचा लेखा जोखा पाहता त्यांना भाजपा जैन प्रकोष्ठ विधानसभा समन्वयक पदी नियुक्ती केली आहे त्यांच्या नियुक्ती बद्दल श्री बाकलीवाल व श्री जोगड यांचा सर्व स्तरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे..भाजपा जैन प्रकोष्ठ विधानसभा समन्वयक पदी निवड झाल्यावर राज्यात जैन आयोग ची निर्मिती व्हावी अशी इच्छा श्री जोगड व बाकलीवाल यांनी बोलताना सांगितले यासाठी ते प्रयत्न करणार आहे या मुळे जैन समाजाला मोठा फायदा होईल असे त्यांनी सांगितले.

# टाकळी राजेराय रस्ता कामात चालढकल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील प्रजिमा ५९ते टाकळी राजेराय रस्ता दर्जोन्नतीकरण पाच वर्ष देखभाल दुरुस्ती करणे कामात सतत चालढकल अनियमता सुरु असुण ठेकेदाराला घेवून वरिष्ठ मुग गिळून असुण कोटी रुपये खर्च करून ही नागरिकांसाठी रस्त्याला घेवून नाराजी असुण रस्ता काम करतांना पुढे पाठ मागे सरसपाट असी स्थीती असुन प्रशासकीय यंत्रणा यांकडे दुर्लक्ष करून आहे.जिल्हाधिकारी यांनी जातीने लक्ष घालून हा प्रकार गौडबंगाल काय आहे .याची साक्ष मोक्ष लावावी असी मागणी नागरिकांतून होत आहे. कानडगाव मंहमदपूर फाटा प्रजिमा.५९ते टाकळी राजेराय ०/००ते५/४०० किमी लांबीचे त्यात डांबरी व कॉंक्रिट पुल मोऱ्या १०नग कामाचे स्वरूप असुन ३५५.५१ लक्ष रुपयांचे काम आहे.तर वर्ष ०९/०२/२०२२ काम सुरु व ०६/०२/२०२३ काम पूर्ण करण्याची मुददत दिलेली आहे. परंतु काम पुर्ण होण्याची मुददत होवून ११महिने उलटले मात्र रस्त्यांचे काम पूर्ण झालेले नाही. यासंदर्भात वेळोवेळी बातम्या द्वारे तक्रार द्वारे अवगत करुनही वरिष्ठ तथा प्रशासकीय यंत्रणा कामांकडे लक्ष देण्यास तयार नाही. तक्रारी नंतर ठेकेदारांकडून डांबरीखडीकरण करण्यात आले परंतु पुढे पाठ मागे सरसपाट म्हणजे डांबरीखडीकरण केलेला रस्ता डांबर होण्यापूर्वीच खडी ठिकठिकाणी उधळून निघत आहे.तर सर्व काम अपुर्ण स्थीतीत पडून आहे.रस्ता काम चालु बंद, चालु बंद असा प्रकार कामांच्या सुरवाती पासुनच सुरु असुण कामात अनियमितता चालढकल असा प्रकार सुरु प्रशासकीय यंत्रणा या कामाकडे दुर्लक्ष का करत आहे.शासन जनतेच्या निधीतून होत असलेल्या काम अंदाज पत्रक प्रमाणे व नियमांनुसार का होत नाही.जिल्हाधिकारी यांनी जातीने लक्ष घालून व पाहणी करून या कामाची साक्षमोक्ष लावावी निधीचा जनते साठी योग्य वापर करण्याचें तंबी प्रशासन व ठेकेदाराला द्यावी असी मागणी नागरिकांतून होत आहे.





# मुली आणि पालकांना भयग्रस्त करणारी समाजव्यवस्था बदलण्याची गरज : डॉ. अहिरे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे धर्म व्यवस्था, समाज व्यवस्था मुलींना आणि पालकांना भयग्रस्त करते. ही समाजव्यवस्थेत परिवर्तन करण्याची गरज आहे. स्त्री पुरुष समताधिष्ठित समाजरचना स्त्रीयांना भयमुक्त करेल असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी व्यवस्थापन परिषद सदस्य कवयित्री प्रा. प्रतिभा अहिरे यांनी ( ता.२९ ) हिवरखेडा गौताळा येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत ग्राम विकासासाठी युवा आणि बाल विवाह बंदी या विषयावर विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या विषयावर डॉ.अहिरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या की, बालविवाहामुळे मातृ मृत्यू दर पाच टक्यांनी वाढतो.साठ टक्के बालमृत्यू होतात, प्रजनन दर व काळ वाढतो. लोकसंख्या वाढते.शहरा पेक्षा ग्रामीण भागात बालविवाह अधिक आहेत.सामाजिक, धार्मिक व आर्थिक दबावामुळे बालविवाह होतात. या मुली शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक पातळीवर वंचित राहतात. मुलीची आब्रू सांभाळण्या पेक्षा तिचा विवाह लावून टाका ही मानसिकता बदलण्याची गरज आहे.शालेय स्तरावरच बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञेचा सहभाग करून प्रबोधन करण्याची गरज आहे.

प्रास्ताविक समन्वयक अशोक प्राध्यापक अशोक भोसीकर यांनी केले विचार पिठावर प्रा. बाबासाहेब देशमुख, कृषी विकास अधिकारी मनोज सैंदाणे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक प्रकाश महाजन प्राध्यापक संतोष देशमुख डॉक्टर अलका गडकरी डॉक्टर सीमा काशीद यांची उपस्थिती होती यावेळी आकाशा ढोणे निकेश सोळुंके ऋषिकेश सोळुंके साक्षी कवडे गायत्री हारमोर मैताली पंचभाई आदींनी मनोगत व्यक्त केले यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता दाभाडे शितल पवार यांनी केले आभार प्राध्यापक संतोष देशमुख यांनी मांडले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# स्काऊट गाईडच्या माध्यमातून तरुणांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास

## आ. किशोर जोरगेवार : पदमापूर येथे स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** आपण इंटरनेट आणि सोशल मिडीयाच्या युगात जगत असतांना जिवनाच्या मुल तत्वांकडून दुरावत जात आहोत. अशात स्काउटिंग गाइडिंग ही एक विशिष्ट तरुण व्यक्तिमत्व विकास संस्था युवकांच्या जिवनाला दिशा देण्याचे काम करत आहे. एकंदर विचार केला असता स्काउट्स गाईड्सच्या माध्यमातून तरुणांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विकास होत असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

चंद्रपूर भारत स्काऊट गाईड, जिल्हा कार्यालय, बहुजन हिताय फाउंडेशन चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पदमापूर येथे स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. स्काउटचे माजी मुख्यालय आयुक्त प्रा. सुर्यकांत खनके, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अध्यक्ष रामपाल सिंग, माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, दिलीप वावरे, विजयराव टोंगे, रुपा ताकसांडे, पद्मापूर च्या सरपंचा उज्वला तापरे, संजय यादव, रुद्र नारायण तिवारी, शांताराम उईके, चंद्रकांत भगत, यशवंत हजारे, रंजाना किन्नाके आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, आजचा युवक मैदानी खेळापासून दूर जात आहे. त्यामुळे विद्यार्थी जीवनापासून त्यांच्यातील कला गुणांचा शोध घेत त्यांना आवड असलेल्या खेळांसाठी त्यांना प्रोत्साहित केल्या गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्काऊट गाईड मध्ये मोठया उत्साहाने सहभाग घेतला पाहिजे. यात जीवन जगण्याची पध्दतीचे शिक्षण दिल्या जाते ते भविष्यात विद्यार्थांना उपयुक्त ठरेल असे ते यावेळी म्हणाले. स्काऊट गाईड ही चळवळ ३ ते २५ वयोगटातील मुले, मुली, तरुण पुरुष आणि महिलांसाठी मानसशास्त्रावर आधारित प्रशिक्षण आणि क्रियाकलाप देते. त्यांच्या सर्वांगीण विकासात मदत करते आणि त्यांना स्थानिक, राष्ट्रीय, जबाबदार सदस्य बनण्यासाठी तयार करते. देशाचे एकनिष्ठ नागरिक राहून स्थानिक, राष्ट्रीय आणि जगभरात एकोपा, परस्पर आदर आणि सहकार्याचा प्रचार करण्याचे काम यातुन केल्या जात असल्याचे ते यावेळी म्हणाले. असे आयोजन आपण नियमीत केले पाहिजे हे समाज हिताचे कार्य असुन यासाठी लोकप्रतिनीधी म्हणून मी सदैव आपल्या पाठीशी असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला स्काउड गाईच्या सदस्यांची हजारोच्या संख्येने उपस्थिती होती.

# नागपूर शहरात तृतीयपंथींची गुंडागर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उपराजधानीत भरदिवसा तृतीयपंथींकडून गुंडागर्दी केली जात आहे. नंदनवन पोलीस ठाणे हद्दीत चार तृतीयपंथी एका वाढदिवस समारंभ असलेल्या घरात गेले. त्यांनी येथे १० हजार रुपये बक्षिसाची मागणी केली. कुटुंबीयांनी ५०० रुपये दिले असता त्यांनी एकाला शिवीगाळ करत मारहाण केली. या घटनेने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पूजा ऊर्फ जोया लखन वर्मा (२५), तन्नू विजय मोरे (३४), ग्लोरी संध्या मल्हारी (२२) आणि ऑटोरिक्षा चालक असे चार आरोपींची नावे आहेत. तर कुणाल जागेश्वर मेश्राम (३२) रा. चिटणीस नगर, शिवसेना चौकजवळ, नागपूर असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. कुणाल यांच्या मुलीचा वाढदिवस असल्याने त्यांनी घराच्या अंगणात समारंभासाठी मंडप टाकला होता. मंडप बघून एका ऑटोरिक्षातून २९ जानेवारीला सकाळी ९ ते ११ वाजतादरम्यान तीन तृतीयपंथी त्यांच्या घरात गेले.

त्यांनी कुटुंबीयांना मुलीच्या वाढदिवसानिमित्त तब्बल १० हजार रुपयांचे बक्षीस मागितले. कुणाल यांनी स्वखुशीने ५०० रुपये तृतीयपंथींना दिले. परंतु, तृतीयपंथींनी कुणाल यांच्या कुटुंबीयांशी वाद घालणे सुरू केले. कुणाल यांनी १० हजार रुपये देणे शक्य नसल्याचे स्पष्ट केल्यावर आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत थेट लाथाबुक्कीने मारहाण सुरू केली. कुणाल यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करत तीन आरोपींना अटक केली आहे. नागपूर शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरात अवैध वसुली करणाऱ्या तृतीयपंथियांविरोधात कारवाई करणार असल्याचे जाहीर केले होते. त्याअंतर्गत या टोळी वा एकटे तृतीयपंथी कुठल्याही कार्यक्रमात पैशाची मागणी करण्यास मनाई करण्यात आली होती. ट्रॅफिक जंक्शन, चौकात एकत्र येण्यास आणि वाहनचालक, प्रवाशांकडून पैसे मागण्यास मनाई करण्यात आली होती.



# सुरजागडच्या जड जड वाहतूक व प्रदूषणामुळे सुशी दाबगाववासीय त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** तालुक्यातील सुशी दाबगाव गावातून मोठ्या प्रमाणात दिवसरात्र सुरजागड येथील लोहखनिज करणाऱ्या कंपनीतर्फे जड वाहतूक सुरू असून जड वाहतुकीमुळे व प्रदूषणामुळे गावकरी त्रस्त झाले आहेत.त्यामुळे यावर प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करावी अन्यथा 9 फेब्रुवारीला गावकऱ्यांना सोबत घेऊन रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचा इशारा उलगुलान समघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू झोडे यांनी दिला आहे. तसे निवेदन मूल येथील तहसीलदार यांना देण्यात आले आहे. गडचिरोली येथील सुरजागड येथील लोहखनिज उत्पादन करणाऱ्या कंपनीतर्फे मोठ्या प्रमाणात मूल तालुक्यातील सुशी दाबगाव या गावातून दिवसरात्र आयरणची जड वाहतूक सुरू आहे.त्यामुळं मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून गावातील शाळा, अंगणवाडी, रुग्णालय व परिसरातील नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

याबाबत अनेकदा प्रशासनाला निवेदन देऊनही याकडे दुर्लक्ष केल्याने नागरिक संतप्त झाले. त्यांनतर राजू झोडे यांना याबाबत सांगितले असता त्यांनी तात्काळ नागरिकांना सोबत घेऊन मूल येथील तहसीलदार यांना निवेदन दिले.

तसेच जड वाहतुक व प्रदूषणावर नियंत्रण न ठेवल्यास 9 फेब्रुवारीला गावकर्यांना सोबत घेऊन रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा राजू झोडे यांनी दिला आहे. यावेळी विनोद शेन्डे, पाटिल वाळके, श्रीकृष्णा सोमनकर, मंगेश कवार, दुशांत सातपुते, नितु आत्राम, कृत्रिक सातपुते, किशोर आत्राम, पंचशील तामगाडगे, जयेश बुरांडे, अमोल बावणे, रुपेश कोढारे आदि गांवकरी उपस्थित होते.

# लोणार येथील वर्धमान गोरक्षणच्या चारा गोडाऊनला लागली आग

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शहरातील वर्धमान गोरक्षणला आज दिनांक ३० जानेवारी च्या सकाळी ९ वाजे दरम्यान कुटार व चारा गोडाऊन ला आग लागली. घटनेची माहिती मिळताच शहरातील तरुण व नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली व लोणार नगर परिषदला याची माहिती देण्यात आली. लोणार नगरपरिषद ने अग्निशमन ची गाडी तात्काळ घटनास्थळी पोहोचली ह्या आगिने एव्हडे रोद्र रुप धारण केले होते. शहरातील पाण्याचे टँकर व अग्नीशमन ने पाणी मारूनही आग विझत नव्हती शेवटी जेसीबी आणून आतील गोदाम मधील कुटार बाहेर औढन्यात आला या वेळी आग भयंकर असल्याने जे सी बी ने सुद्धा आग विझवताना अनेक अडचणी येत होत्या तरी ही शहरातील अनेक तरुण यांनी आत गोदाम मध्ये जाऊन व शेड वरील टिन पत्रे खोलून आग विझवण्यासाठी प्रयन्त केले यावेळी या ठिकाणी काँग्रेस तालुका अध्यक्ष राजेश मापारी, नगरपरिषद गटनेते भूषण मापारी, रमण बोरा, डॉ संतोष संचेती यांनी भेट दिली.

तसेच मंडळ अधिकारी लक्ष्मण सानप,तलाठी अशोक सौदर, सचिन शेवाळे, लोणार पोलीस स्टेश चे विशाल धोंडगे, बिट जमादार संतोष चव्हाण,अनिल शिंदे, गजानन डोईफोडे यांनी भेट देऊन पंचनामा केला.

या वेळी आग विझवण्यासाठी कुशल संचेती, सुमित बोरा,सुंदर संचेती, तुषार संचेती, देवांग संचेती, हर्ष रूनवाल, तानाजी मापारी, सुशील डोंगरवाल, गोपी सोनिग्रा, विशाल वर्मा, रंजित बेहरा ,कैलास मादनकर, अक्षय मोरे ,अश्विन दीक्षित, अरबाज खान, संतोष मिसाळ अग्निशमन चे विकास नेवरे, प्रभाकर सानप, राजेश्वर राऊत यांनी शर्यतीचे प्रयन्त केले.



# भूमिपुत्र धडकले लॉयड मेटल कंपनीवर, शेतकरी, बेरोजगारांना न्याय द्याः दिनेश चोखारे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील घुग्घूस शहर व ग्रामीण भागातील भूमिपुत्र, शेतकरी व बेरोजगारांच्या विविध मागण्यांसाठी सोमवारी कंपनीवर धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात सुमारे १००० हून अधिक आंदोलक सहभागी झाले होते.आंदोलकांनी कंपनीच्या गेटसमोर ठिय्या मांडला आणि आंदोलन सुरू ठेवले आहे. पोलिसांनी आंदोलकांना कोर्टाचे आदेश दाखवून थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतु आंदोलकांनी त्यास विरोध केला. या मोर्चाचे नेतृत्व काँग्रेस नेते व भूमिपुत्र संघटनेचे संयोजक दिनेश चोखारे यांनी केले. या मोर्चात कंपनीकडून स्थानिक सुशिक्षित व बेरोजगार युवकांना नोकरी देणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे होणारे नुकसान भरपाई देणे, कंपनीच्या CSR फंडाचा योग्य वापर करणे, कंपनीच्या अतिक्रमण हटवणे, कंपनीच्या भोंगळ कारभाराची चौकशी करणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कंपनीत कायमस्वरूपी रोजगार देणे, कंपनीचे जड वाहतूक शहराच्या मध्यभागातून बंद करणे, स्थानिक महिला बचत गटांना कंपनीच्या CSR फंडाच्या माध्यमातून घरेलू उद्योगाकरिता प्राधान्य देणे आदी मागण्या करण्यात आल्या. आंदोलकांनी चेतावणी दिली की, जर कंपनीने त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर ते आणखी तीव्र आंदोलन करण्यास तयार आहेत. यावेळी आयोजक माजी सदस्य ग्रामपंचायत घुघुस पवन अगदारी, सुधाकर बांदुरकर माजी उपसरपंच ग्रामपंचायत घुघुस, हेमंत उरकुडे, शेखर तंगडपल्ली, प्रेमानंद जोगी, लखन हिकरे, तोफिक शेख, सुरज बहुराशी, सिनू गुडुला, सुधाकर बांदुरकर, हेमंत उरकुडे, म्हातरदेवी सरपंच संध्याताई पाटील, पंचायत समिती सदस्य रजीता



पवनकुमार आगदरी, पवन चांकपुरे, दिलीप ठाकरे, दिलीप मत्ते, बबन सावे, अमोल आत्राम, शंकर उईके, तुळशीराम दरेकर, सुरज बहुरिया, साखरवाही सरपंच नागेश बोंडे, घोनाडच्या सरपंच संगीता मत्ते, गणेश आवारी, संजय टिपले, दिनेश टिपले, हसिम खान, संतोष बांदुरकर, हितेश लोडे, दिनेश भोगले, भास्कर सोनेकर, सुधाकर वारारकर, रमेश काळे, श्यामराव उपरे, यांचे सह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

# मैत्री कट्टा कविमनाचा साहित्य संमेलन थाटामाटात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मैत्री कट्टा कवी मनाचा साहित्यसमूहाचे दुसरे साहित्य संमेलन दि.२८/०१/२०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, उरुवेला कॉलनी छत्रपती चौक नागपूर येथे मोठ्या थाटामाटात पार पडले. या कार्यक्रमाचे आयोजन अल्का धोंडणे- साखरे (समूह संस्थापिका मैत्रीकट्टा कवी मनाचा)यांनी केलं होतं . कार्यक्रमाचे उद्घाटन श्री कैलाश धोंडणे ( वनपरिक्षेत्र अधिकारी, ब्रह्मपुरी) व सौ. प्राची धोंडणे (नगरसेविका कुरखेडा ) यांनी केलं. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आवटे (कवी व साथरोग तज्ञ ) डॉ. संजय कार्लेकर ( किटक शास्त्रज्ञ), सौ. संगीता ठलाल ( कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या), अस्तीन चौरे (प्रसिद्ध कवी ), श्री.अनिल प्रल्हाद साखरे ( केंद्रप्रमुख जि. प. छ. संभाजीनगर) मा.शोभा वेले ( कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या) डॉ. यमुना नाखले (कवयित्री / विचारवंत), तसेच संमेलनाध्यक्ष मा. अशोक बिरबल कांबळे (ज्येष्ठ साहित्यिक) , कवीसंमेलनाध्यक्ष मा.वैभव धर्माधिकारी (व्याख्याते तथा सदस्य साहित्य विचारपीठ मुंबई) ,अल्का साखरे - धोंडणे (संस्थापिका / अध्यक्ष मैत्री कट्टा कवी मनाचा ) उपस्थित होते . मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.पहिल्या सत्रामध्ये साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या साहित्यिकांचा काव्यरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

तसेच याप्रसंगी अल्का साखरे - धोंडणे लिखित प्रीतगंध काव्यसंग्रह , प्रभात पुष्प सुविचार संग्रह व संगीता रामटेके लिखित वेदनेचं काहूर काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. प्रीतगंध या काव्यसंग्रहावर भाष्य करताना . मा. संतोष मेश्राम यांनी कवयित्रीच्या अंतरंगातील भावभावनांना काव्यात सुंदररीत्या गुंफण केलेलं सांगितलं तर प्रभातपुष्पावर भाष्य करताना मा. संगीता ठलाल यांनी अशा सुविचारांची आज जगाला गरज आहे हे सांगितलं. डॉ. आवटे यांनी कविता कशी असावी यावर मोलाचं मार्गदर्शन केलं तर उद्घाटक मा. कैलाश धोंडणे सरांनी सर्व स्तरातून कवितेचे लिखाण व्हावं असं सांगितलं . मा. प्राची धोंडणे यांनी सर्व साहित्यिकांना पुढील उज्वल साहित्य लेखनासाठी शुभेच्छा दिल्या तर साहित्य संमेलनाध्यक्ष मा.




अशोक बिरबल कांबळे यांनी सर्वांना दर्जेदार कविता लिखाणासाठी शुभेच्छा दिल्या .दुसऱ्या सत्रात कवीसंमेलन मा. वैभव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलं.जवळजवळ ४० कवी/ कवयित्रींच्या उत्कृष्ट रचनांची ,गझलांची मेजवाणीच या वेळेला ऐकण्यास मिळाली. सरते शेवटी कवीसंमेलनाध्यक्ष मा. वैभव धर्माधिकारी यांनी कविता व चारोळीविषयी मार्गदर्शन करतांना कविता लिहिणे म्हणजे केवळ यमक जुळवणे नसून त्याचा मतितार्थ , भावार्थ त्या कवितेतून समजावा अशी कविता /चारोळी असावी असे सांगितलं. या कार्यक्रमात पहिल्या सत्राचं मा. संतोष मेश्राम यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केलं तर दुसऱ्या सत्रात चेतना तळवेकर यांनी उत्कृष्ट संचालन व आभार प्रदर्शन केलं .या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील काळमेघ यांच खूप मोलाचं सहकार्य लाभलं तसेच डॉ .यमुना नाखले मॅडम यांचही सहकार्य लाभलं . संचालिका मा. वैशाली साळुंखे मॅडम यांच्याही शुभेच्छा संमेलनाला मिळाल्या. त्याचप्रमाणे सुनील तरारे यांची कलात्मक रांगोळी सर्वांना मोहवून गेली. आयोजना संबंधी सोपविलेली जबाबदारी समूह संचालक संतोष मेश्राम यांनी योग्यरित्या पार पाडली. संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वच आयोजक व संचालक मंडळांनी खूप मेहनत घेतली. सर्व उपस्थित कवी/कवयित्री व मान्यवर यांनी अल्का धोंडणे- साखरे यांचे भरभरून कौतुक केले व पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या.




# गुजराती महिला वन अधिकाऱ्याचा उत्कृष्ट वन्यजीव संवर्धन कार्यासाठी गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सेवानिवृत्त वन कर्मचारी (सेवक) संघ, पुणे ही २७ वर्षांपूर्वी स्थापन झालेली सेवानिवृत्त वन अधिकाऱ्यांची सेवाभावी समर्पित संस्था आहे. ती वनीकरण, वन्यजीव वनविषयक प्रशिक्षण आणि पर्यावरण क्षेत्रात सतत कार्यरत आहे. सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे यांची महाराष्ट्र राज्यातील वन विभागातील उत्कृष्ट नाविन्यपूर्ण, क्षेत्रीय कार्य करणा-या कर्मचाऱ्यांची ओळखून व शोधून त्यांचा सत्कार करण्याची आणि त्यांचे उत्कृष्ट कार्य सार्वजनिक क्षेत्रात आदर्श म्हणून आणण्याची परंपरा आहे.

या वर्षी सेवक संघाने राज्याबाहेर गुजरात राज्यात आपला दृष्टीक्षेप टाकत तेथून श्रीमती रसीलाबेन वाढेर यांना शोधले. सेवक संघास हे कळवण्यास अत्यंत आनंद होत आहे की, श्रीमती रसीलाबेन वाढेर, रेंज फॉरेस्ट ऑफिसर, सामाजिक वनीकरण विभाग, वेरावळ, सोमनाथ गिर विभाग, गुजरात यांना 1100 हून अधिक वन्यजीव बचाव कार्यात केलेल्या उत्कृष्ट आणि अवाढव्य कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. गीर नॅशनल पार्क आणि वन्यजीव अभयारण्यात वन्य प्राण्यांपासून जीवावर होणाऱ्या हल्ल्याचा धोका, झुनोटिक रोगांना बळी पडण्याची श्क्यता, प्रतिकूल हवामान आणि सतत दिवस-रात्र संरक्षणकामी गस्ती व पुरूष सदस्यांमध्ये एकमेव विवाहित महिला कर्मचारी तणाव निर्माण करणा-या संघर्षमय परिस्थितीत दौरे आणि इतर अनेक त्रासदायी बाबींचा गुंता असूनही त्यांनी हिम्मत धैर्य आणि निष्ठेने इतरही उपक्रम जसे कर्मचारी प्रशिक्षण, वन्य प्राण्यांचे पुनर्वसन व्यवस्थापन, स्वीपणे केले.

श्रीमती रसीलाबेन यांना दि. २८ जानेवारी २०२४ रोजी सेवक संघाचे स्थापना दिनानिमित्त आणि सन 2022-23 ची AGM सन्मान पत्र देवून श्री. ऋषिकेश रंजन, मुख्य वनसंरक्षक, नाशिक वन वृत्त, श्री. विश्वास सावरकर, माजी संचालक, भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून आणि सध्या NBWL चे सदस्य आणि अध्यक्ष सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे व इतर मान्यवरांचे हस्ते गौरविणेत आले. श्रीं एस.के. गवळी, सेवक संघ महाराष्ट्र संघाचे उपाध्यक्षांच्या पुढाकाराने व श्री. मदन कुलकर्णी, कार्यकारीअध्यक्ष, डॉ. एस.एच. पाटील श्री.व्ही.टी. पत्की, सदस्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम झाला. श्रीमती रसीलाबेन यांना यापूर्वी माननीय श्री. नरेंद्र, मोदीजी आणि आनंदीबेन पटेल व अलीकडेच प्रजासत्ताक दिनी, २६ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रपती भवनात विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. वन्यप्राणी बचाव कामात त्यांनी दाखवलेली धाडसी वृत्ती , कर्तव्य परायणता, सेवाभाव,निष्ठा यामुळे वनपाल श्रीमती रशिलाबेन यांना अनेक बक्षिसे मिळाली आहेत, सत्कार झाले आहेत. तसेच सोशल मीडियावर, युट्युबवर त्यांच्या कामाची ठळकपणे नोंद घेऊन फार मोठ्या प्रमाणात प्रसिद्धीही मिळाली आहे. गुजरातमधील वन्यजीव बचाव पथकातील प्रथम महिला अधिकारी म्हणून रसिलाबेन यांना बहाल करण्यात आलेले इतर पुरस्कार असून त्यात "वन्य जीवन सेवा पुरस्कार", "सिंह राणी" "हीरा मानेक रत्न पुरस्कार" आणि "नारी गौरव पुरस्कार" आहेत.

# राष्ट्रीय पुरस्कार विजेते महेश काळे यांची स्नेहसावलीसाठी संगीत मैफल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील परावलंबी व्यक्तींचे सुश्रूषाकेंद्र असलेली स्नेहसावली केअर सेंटर ही सामाजिक संस्था मागील साडेपाच वर्षांपासून दीर्घ आजारांनी ग्रासलेल्या व्यक्तींना शास्त्रशुद्ध पद्धतीने सुश्रुषा देण्याचे काम करीत आहे. संभाजीनगरच्या काही डॉक्टरांनी निःस्वार्थ भावनेनेने सुरू केलेला ह्या निवासी प्रकल्पात एकाच छताखाली नर्सिंग केअर, फिजिओथेरपी, समुपदेशन, आरोग्यदायी आहार व मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी विविध उपक्रम घेतले जातात. आतापर्यंत एक हजारापेक्षा जास्त गरजूंनी ह्या प्रकल्पाचा लाभ घेतला असून सध्या विविध वयोगटातील ५५ परावलंबी व्यक्ती इथे वास्तव्यास आहेत. त्याकरिता डॉक्टर्स, प्रशिक्षित परिचारिका, केअर गिव्हर २४ तास कार्यरत असतात. निराधार, गरीब, गरजू रुग्णांची पूर्ण आर्थिक व इतर जबाबदारी संस्था घेते व इतरांनादेखील नाममात्र दरात ही सुविधा उपलब्ध आहे. सध्या स्नेहसावली प्रकल्प भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीमध्ये सुरू असून नुकताच संस्थेला १०,००० चौ. फूटाचा प्लॉट मिळाला आहे. त्यावर परावलंबी व्यक्तींकरिता सर्व सोयींनी उपयुक्त व परिपूर्ण इमारत बांधण्याचा आमचा मानस आहे. त्याकरिता संस्थेला निधीची आवश्यकता असून आपल्या सर्वांच्या सहभागातूनच हे कार्य घडणार आहे व जास्तीत जास्त गरजूंना लाभ मिळणार आहे. स्नेहसावलीच्या नवीन इमारतीच्या उभारणीसाठी निधी संकलित करण्याच्या उद्देशाने प्रख्यात गायक व राष्ट्रीय पुरस्कार विजेते श्री महेश काळे ह्यांच्या गायनाचा कार्यक्रम "स्नेहसंध्या" दि १० फेब्रुवारी २०२४ रोजी शनिवारी संध्याकाळी ७ ते १० वेळेत रुक्मिणी हॉल एम. जी. एम. एन ५ सिडको येथे आयोजित करण्यात आलेला आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी



देणगीमूल्य देऊन प्रवेशिका घ्यावात व संगीतमय सोहळ्याचा आस्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून जमा होणारा निधी संस्थेच्या सामाजिक कार्यासाठी सत्कारणी लावण्यात येईल. संस्थेला मिळालेले देणगीमूल्य हे आयकर ८० जी च्या अंतर्गत सवलतीस पात्र असेल.

# मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अंजली धानोरकर

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण महर्षी वसंतराव काळे प्रतिष्ठान, किसान वाचनालय, पळसप (जि. धाराशिव) व महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित एक दिवसीय मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद छत्रपती संभाजीनगर येथील सिद्धहस्त लेखिका, प्रेरक व्याख्यात्या तथा उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर भूषविणार आहेत.

यानिमित्ताने समाजातील सर्व स्तरातून अंजली धानोरकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अंजली धानोरकर यांची साहित्यसंपदा खालीलप्रमाणे आहे. गट्टी फू (बालकथा संग्रह) मनतरंग (ललित लेख संग्रह) व्यक्तिमत्त्व विकासासाठी सॉफ्ट स्किल्स (व्यक्तिमत्त्व विकासासंदर्भातील पुस्तक) मला आय. ए. एस. व्हायचंय ( अनुवादित) द लीडर इन यू (अनुवादित) याशिवाय, मनतरंग या पुस्तकातील काहूर या लेखाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए., बी. एससी च्या द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात २०१२-१३ पासून समावेश तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सुद्धा २०१७-१८ पासून 'देहबोली व संवाद कौशल्य' हा धडा पाठ्यक्रमामध्ये समाविष्ट. सॉफ्ट स्किल ट्रेनर म्हणून विविध शासकीय प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना विविध सॉफ्ट स्किल्सच्या विषयांवर प्रशिक्षण. अनेक शैक्षणिक तथा औद्योगिक संस्थांमधून प्रेरक व्याख्याने.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर